



# गोदातीर समाचार


RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com








* वर्ष ६५ वे * अंक २०६ * नांदेड * मंगळवार, दि. ४ ऑगस्ट २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211


## तीन राज्यांच्या पोटनिवडणुकांचे निकाल

### बिहारमध्ये प्रशांत किशोरांचा करिष्मा, गुजरातमध्ये भाजपची बाजी, मध्य प्रदेशात काँग्रेसची सरशी

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** बिहार, गुजरात आणि मध्य प्रदेशातील तीन विधानसभा पोटनिवडणुकांचे निकाल सोमवारी जाहीर झाले. बिहारमध्ये जन सुराज पक्षाचे प्रमुख प्रशांत किशोर यांनी भाजपचा ३१ वर्षांचा बालेकिल्ला भेदत ऐतिहासिक विजय मिळवला. गुजरातमध्ये भाजपने मांजलपूर मतदारसंघ कायम राखला, तर मध्य प्रदेशातील दतिया मतदारसंघात काँग्रेसने विजय संपादन करत जागा कायम ठेवली.

बिहारमधील बांकीपूर मतदारसंघात जन सुराज पक्षाचे प्रमुख प्रशांत किशोर यांनी भाजपचे नीरज कुमार यांचा सुमारे १९ हजार मतांनी पराभव केला. हा मतदारसंघ १९९५ पासून भाजपच्या ताब्यात होता. त्यामुळे हा निकाल भाजपसाठी मोठा राजकीय धक्का मानला जात आहे.

गुजरातमधील मांजलपूर मतदारसंघात भाजपचे सतीश गोविंदभाई पटेल यांनी काँग्रेसचे भिखाभाई रबारी यांचा ३०,६३० मतांनी पराभव करत भाजपचा गड कायम राखला.

मध्य प्रदेशातील दतिया मतदारसंघात काँग्रेसचे घनश्याम सिंह यांनी भाजपचे आशुतोष तिवारी यांचा ६,०१६ मतांनी पराभव केला. या विजयामुळे काँग्रेसने ही जागा आपल्या ताब्यात कायम ठेवली.

या तीन पोटनिवडणुकांमध्ये बिहारमध्ये जन सुराज पक्षाचा उदय, गुजरातमध्ये भाजपची पकड कायम आणि मध्य प्रदेशात काँग्रेसची ताकद अबाधित असल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे. विशेषतः बांकीपूरमधील प्रशांत किशोर यांच्या विजयाकडे आगामी बिहार विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महत्त्वपूर्ण राजकीय घडामोड म्हणून पाहिले जात आहे.

#### भाजपच्या प्रतिष्ठेला 'दे धक्का'; प्रशांत किशोरांचा मोठा विजय

भारतीय जनता पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नवीन राज्यसभेवर आल्यानंतर त्यांच्या होम पीचवर म्हणजेच त्यांच्या स्वतःच्या विधानसभा मतदारसंघात प्रशांत किशोर यांच्या जनसुराज पक्षाने जोरदार लढत दिली. राजकीय रणनीतीच्या कॉर्पोरेट उद्योगातून राजकारणात उडी घेतलेल्या प्रशांत किशोरांचा या निवडणूक निकालामुळे जोरदार लाँचिंग झालं आहे. या निवडणुकीच्या वेगवेगळ्या अर्थांचा मागोवा निकालानंतर घेतला जात असून काँग्रेसशिवाय भाजपला विरोध करणारा नवा चेहरा प्रशांत किशोर यांच्यारुपाने उदयास आला आहे. येथील पोटनिवडणुकीत प्रशांत किशोर यांचा विजय म्हणजे भाजपच्या प्रतिष्ठेला धक्का मानला जात आहे. दरम्यान, प्रशांत किशोर यांनी १८,९५३ मतांनी दणदणीत विजय मिळवला.

## महापालिकेकडून ईदगाह कमान रोड ते बोंढार बायपास रस्त्यावरील अतिक्रमणे जमीनदोस्त

### शहरातील विविध भागांतही धडक कारवाई



**नांदेड (प्रतिनिधी)–** मंजुर विकास आराखड्यातील रस्ता रुंदीकरणात अडथळा ठरणाऱ्या ईदगाह कमान ते बोंढार बायपासकडे जाणारा रस्ता अतिक्रमणमुक्त करण्यासाठी महानगरपालिकेच्यावतीने दि.३ ऑगस्ट रोजी एक मोठी आणि धडक मोहीम हाती घेण्यात आली. मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे आणि पोलीस अधिक्षक डॉ. निलभ रोहन यांच्या संयुक्त मार्गदर्शनाखाली, शहरातील मुख्य मार्ग असलेल्या ईदगाह कमान रोड ते बोंढार बायपास रोडवरील अनेक वर्षांचे पक्के व कच्चे अतिक्रमण मनपाच्या पथकाने जे.सी.बी.च्या सहाय्याने पूर्णपणे जमीनदोस्त केले आहे.

ईदगाह कमान ते बोंढार बायपास हा मंजुर विकास आराखड्यानुसार ६० फुटाचा रस्ता करण्याचे काम सार्वजनिक बांधकाम विभाग मार्फत करण्यात येत होते. परंतु येथील अतिक्रमणामुळे मागील दोन वर्षांपासून सदरील रस्त्याचे काम प्रलंबित होते. रस्ता रुंदीकरणाच्या जागेत स्थानिक नागरिकांनी आपली घरे ३३ फुटापर्यंत रस्त्यावर अतिक्रमण **(पान ३ वर...)**

#### मनपा प्रशासनाचा कडक इशारा

शहरातील सर्व व्यावसायिक आणि नागरिकांनी सार्वजनिक रस्ते, पदपथ आणि महापालिकेच्या जागेवर पुन्हा अतिक्रमण करू नये. अतिक्रमण काढण्याच्या कारवाईत जप्त केलेले साहित्य परत केले जाणार नाही आणि दंडही ठोठावला जाईल. त्यामुळे शहराच्या विद्रुपीकरणाला कारणीभूत ठरणारे आणि वाहतुकीला अडथळा ठरणारे अतिक्रमण स्वतःहून काढून घ्यावे, अन्यथा मनपातर्फे अशाच प्रकारे तीव्र स्वरूपाची बुलडोझर कारवाई करण्यात येईल, असा इशारा मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांनी दिला आहे.

## दर्जेदार नाट्य महोत्सवांचे सातत्य कायम रहावे –महापौर कविता मुळे

### स्वप्नरंग नाट्य महोत्सवाचे उत्साहात उद्घाटन; अलेक्झांडर व्हाया डायोजेनिसला रसिकांचा प्रतिसाद



**नांदेड (प्रतिनिधी)–** संस्कृती मंत्रालय, भारत सरकार आणि स्वप्नरंग सांस्कृतिक संस्था, नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित स्वप्नरंग नाट्य महोत्सवाचे उद्घाटन रविवार, दि. २ आगस्ट रोजी डॉ. शंकरराव चव्हाण सभागृहात उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. यावेळी अध्यक्षस्थानावरून बोलताना महापौर कविता मुळे यांनी नांदेडमध्ये अशा दर्जेदार नाट्य महोत्सवांचे सातत्य कायम रहावे, अशी अपेक्षा व्यक्त करत स्वप्नरंग सांस्कृतिक संस्थेच्या कार्याचे कौतुक केले. तसेच संस्थेच्या पाठीशी महानगरपालिका व स्वतः चे सहकार्य कायम राहील, अशी ग्वाहीही त्यांनी दिली.

ज्येष्ठ रंगकर्मी डॉ. विजयकुमार माहुरे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन व नटराज पूजन करून महोत्सवाचे उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महापौर कविता मुळे होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून उपमहापौर दीपकसिंघ रावत, महानगरपालिका आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, ज्येष्ठ रंगकर्मी राजीव किवळेकर, लक्ष्मण संगेवार आणि डॉ. राम चव्हाण उपस्थित होते.


**(पान ३ वर...)**

## वर्गमित्रावरच प्राणघातक हल्ला; दोन अल्पवयीन विद्यार्थी ताब्यात

### असर्जन येथील शाळेत धक्कादायक प्रकार

**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्ह्यातील असर्जन येथील शंकरराव चव्हाण विद्यालयात सोमवार, दि. ३ ऑगस्ट रोजी सकाळी विद्यार्थ्यांमधील वादाचे पर्यवसान चाकू हल्ल्यात झाल्याची धक्कादायक घटना घडली. या घटनेत दहावीतील एका विद्यार्थ्याच्या गळ्यावर, पोटावर व शरीराच्या इतर भागांवर चाकूने वार करण्यात आल्याने तो गंभीर जखमी झाला आहे. त्याच्यावर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, विष्णुपुरी येथे उपचार सुरू आहेत.

दि. ३ ऑगस्ट रोजी सकाळी सुमारे १०.२० **(पान ३ वर...)**







जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन

संस्थापक संपादकः
कै. दैविदासराव रसाळ


गोदातीर समाचार


संपादक
केशव घोणसे पाटील


# एआयचा वाढता वेग: जगाला धोकादायक?


कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात एआय हे आजच्या काळातील सर्वात प्रभावी आणि परिवर्तन घडवणारे तंत्रज्ञान ठरत आहे. आरोग्य, शिक्षण, उद्योग, शेती, संरक्षण, संशोधन आणि प्रशासन अशा प्रत्येक क्षेत्रात एआयचा वापर झपाट्याने वाढत आहे. मात्र, ज्या वेगाने या तंत्रज्ञानाचा विस्तार होत आहे, त्याच वेगाने त्याच्या सुरक्षिततेबाबतचे प्रश्नही पुढे येत आहेत. अमेरिकेतील ओपनएआय, गुगल, मेटा, मायक्रोसॉफ्ट आणि अँथ्रॉपिकसारख्या आघाडीच्या कंपन्यांतील १,१७८ तज्ज्ञांनी एआयचा विकास नियंत्रित गतीने करण्याची मागणी करणारी याचिका दाखल केली आहे. ही बाब केवळ अमेरिकेपुरती मर्यादित नसून संपूर्ण जगासाठी गंभीर इशारा मानावा लागेल. आज एआय केवळ मानवी प्रश्नांची उत्तरे देत नाही, तर चित्रे तयार करतो, संगणकीय प्रोग्राम लिहितो, संशोधनात मदत करतो आणि निर्णयप्रक्रियेतही सहभागी होत आहे. भविष्यात एआय स्वतःच संशोधन करून नवीन प्रणाली विकसित करू लागला, तर त्यावर मानवी नियंत्रण कायम राहील का, हा मोठा प्रश्न आहे. तंत्रज्ञानाचा इतिहास पाहिला तर प्रत्येक मोठ्या शोधामुळे मानवाला लाभ झाला आहे; पण त्याचबरोबर त्याचा गैरवापरही झाला आहे. अणुऊर्जेपासून इंटरनेटपर्यंत प्रत्येक तंत्रज्ञानासाठी योग्य नियम आणि नियंत्रणाची गरज भासली. एआय याला अपवाद असू शकत नाही. विशेष म्हणजे ही चिंता एआयविरोधी व्यक्तींनी व्यक्त केलेली नाही. उलट, एआय विकसित करणाऱ्या कंपन्यांतील वरिष्ठ वैज्ञानिक, अभियंते आणि अधिकारीच याबाबत सावधगिरी बाळगण्याचे आवाहन करत आहेत. याचा अर्थ, तंत्रज्ञानाच्या मर्यादा आणि संभाव्य धोके त्यांना अधिक स्पष्टपणे दिसत आहेत. एआय सुरक्षित मर्यादा ओलांडत असल्याचे काही चाचण्यांमध्ये दिसून आल्याने या चिंतेला अधिक वजन प्राप्त झाले आहे. एआयचे फायदे नाकारता येणार नाहीत. वैद्यकीय निदान अधिक अचूक होऊ शकते, शेतकऱ्यांना हवामान व पीक व्यवस्थापनाची माहिती मिळू शकते. विद्यार्थ्यांना वैयक्तिक शिक्षण मिळू शकते आणि उद्योगांची उत्पादकता वाढू शकते. परंतु दुसऱ्या बाजूला रोजगारांवर परिणाम, खोटी माहिती (डीपफेक), सायबर गुन्हे, गोपनीयतेचा भंग, स्वयंचलित शस्त्रास्त्रांचा वापर आणि मानवी निर्णयक्षमतेवर होणारा परिणाम यांसारखी गंभीर आव्हानेही आहेत. याच कारणामुळे एआयसाठी जागतिक स्तरावर स्पष्ट नियमांची आवश्यकता आहे. कोणते मॉडेल कितपत विकसित करावे, कोणत्या टप्प्यावर स्वतंत्र सुरक्षा चाचणी करावी, कोणत्या परिस्थितीत विकासाला तात्पुरता विराम द्यावा आणि एआयमुळे झालेल्या नुकसानीची जबाबदारी कोणाची असेल, याबाबत ठोस कायदेशीर चौकट तयार करणे अत्यावश्यक आहे. जशी औषधांच्या निर्मितीपूर्वी कठोर चाचणी केली जाते, तशीच एआय प्रणालींसाठीही सुरक्षा मानके अनिवार्य केली पाहिजेत. भारतासारख्या वेगाने डिजिटल होत असलेल्या देशासाठी हा विषय अधिक महत्त्वाचा आहे. भारत एआय क्षेत्रात मोठी झेप घेण्याच्या तयारीत आहे. त्यामुळे नवकल्पनांना प्रोत्साहन देतानाच सुरक्षितता, पारदर्शकता आणि नैतिकतेची तत्त्वेही काटेकोरपणे लागू करावी लागतील. एआय साक्षरता वाढविणे, संशोधनाला चालना देणे, डेटा संरक्षणाचे प्रभावी कायदे आणि स्वतंत्र नियामक यंत्रणा उभारणे ही काळाची गरज आहे. तंत्रज्ञानाला विरोध करणे हा उपाय नाही; परंतु तंत्रज्ञानावर मानवी नियंत्रण कायम ठेवणे ही प्रत्येक समाजाची जबाबदारी आहे. एआय मानवाच्या विकासासाठी असावा, मानवावर नियंत्रण मिळविण्यासाठी नव्हे. त्यामुळे विकासाचा वेग आणि सुरक्षिततेचा समतोल साधणे हीच खरी शहाणपणाची भूमिका ठरेल. आज अमेरिकेतून उमटलेला हा इशारा जगातील सर्व सरकारांनी आणि तंत्रज्ञान कंपन्यांनी गांभीर्याने घेतला, तर भविष्यात एआय मानवजातीसाठी वरदान ठरेल; अन्यथा त्याच तंत्रज्ञानाचे संकटात रूपांतर होण्याची शक्यता नाकारता येणार नाही.

# सालाना बरसी आणि संतांचे पावन स्मरण


संत बाबा आत्मासिंघजी मोनी


संत बाबा शीशासिंघजी कारसेवा वाले


संत बाबा निधानसिंघजी (१०८)


संत बाबा हरनामसिंघजी

गुरुद्वारा श्री लंगर साहिब ही नांदेडची एक समृद्ध अशी धार्मिक संस्था आहे. संतबाबा निधानसिंघजी यांनी स्थापन केलेल्या या धार्मिक संस्थेचे संचालन सध्या कारसेवेच्या माध्यमातून केले जात आहे. हजुरसाहिब, नांदेडच्या दर्शनासाठी येणाऱ्या भविकांची उत्तम सोय व्हावी असे मुख्य उद्दीष्ट असले तरी गुरुद्वारा लंगरसाहिब ट्रस्ट नेहमीच नांदेडकरांच्या मदतीसाठी धावून येते. नांदेडच्या पावनभूमित मागील एका शतकाहुन अधिक काळ गुरुद्वारा श्री लंगर साहिब संस्था वाटचाल करीत आहे. तत्कालीन संत मंडळीच्या कार्यांचे स्मरण व्हावे म्हणून गुरुद्वारा श्री लंगर साहिबमध्ये दरवर्षी दिनांक ४ ऑगस्ट रोजी श्रद्धाभावाने चार संतांच्या स्मरणार्थ सालाना बरसी साजरी करण्यात येते.

सालाना बरसी समगम आता देशपातळीवर नावलौकिक झाल्यामुळे समाजात मोठा कार्यक्रम होत असून, त्यामुळे उत्साहात निर्माण होता. यावर्षी गुरुद्वारा श्री लंगरसाहिब अंतर्गत रत्नागिरी जवळ बांधण्यात आलेल्या गुरुद्वारा रतनगढ साहिब नावाच्या गुरुद्वाराच्या नवीन वास्तूचे लोकार्पण करण्यात आले आहे. याची गणना देखील एक उत्कृष्ट उपक्रम म्हणून केली जाईल यात शंका नाही. गुरुद्वारा श्री लंगर साहिब ट्रस्ट संतबाबा निधान सिंघजी संस्थेचे मुखी संतबाबा नरिंदरसिंघजी कारसेवावाले आणि मुखी संतबाबा बलविंदरसिंघजी कारसेवावाले यांच्या नेतृत्वात होत असलेले सेवाकार्य नांदेडसाठी एक पर्वणीच होय. प्रतिदिन हजारो भाविकांसोबत गरजू लोकांना अन्नदान करण्याचे गुरुद्वाराचे उपक्रम शीख धर्म तत्त्वाशी सुसंगत असे आहे.

यावर्षी संत बाबा निधानसिंघजी यांची ७९ वी बरसी (स्मरण दिवस) साजरी होत आहे. सन १९४८ पासून दिवंगत संताच्या स्मरणार्थ येथे सालाना बरसी समगम दरवर्षी साजरा केला जातो आहे. संत बाबा निधानसिंघजी यांनी त्यांच्या हयातीत गुरुद्वारा श्री लंगर साहिबची स्थापना केली होती. जवळपास पस्तीस वर्षे गुरुद्वाराचे संचालन त्यांनी केले. गोदावरी नदीकाठी त्यांनी भाविकांची सोय व्हावी म्हणून लंगरसेवा सुरु केली होती. विपरीत आर्थिक परिस्थिती आणि कमी प्रमाणात मनुष्यबळाचा सामना करीत त्यांनी तेव्हा सेवेची प्रथा सुरु केली. झोळीत उकळलेले चने ठेवून एक मुठभर चने ते लंगर म्हणून वाटायचे. नंतर त्यांनी परिश्रमाने लंगर सेवा सुरु केली आणि विस्तारली. संतबाबा निधानसिंघजी यांनी दिनांक ४ ऑगस्ट सन १९४७ रोजी जगाचा निरोप घेतला. त्यांनी सुरु केलेल्या सेवेची जवाबदारी संतबाबा हरनामसिंघजी यांच्यावर सोपवली गेली.

संतबाबा हरनामसिंघजी यांनी गादी सांभाळल्यानंतर सामाजिक उपक्रमांची सुरुवात केली. त्यांनी अनेक सैक्षणिक उपक्रम राबविले. शहरातील काही शाळा संचालनासाठी तन, मन, धन या भावनेने भरीव योगदान दिले. नांदेडमध्ये श्री गुरु गोबिंदसिंघजी अभियांत्रिकी महाविद्यालयाची स्थापना व्हावी म्हणून विष्णुपुरीत ३५ ते ४० एकर जागा आणि ईमारत उभी करण्यासाठी लक्षावधी रुपयांचे दान दिले. त्यामुळे आज एक ॲटोनोमसस्तरीय अभियांत्रिकी महाविद्यालय आपल्याकडे आहे. त्या योगदानाच्या मोबदल्यात शासनाने गुरुद्वारा लंगर साहिब ट्रस्टला प्रवेश प्रक्रियेत संचालक कोटा देण्याचा निर्णय घेतला आणि तो अमलातही आहे. गुरुद्वारा लंगर साहिब संचालकाच्या भूमिकेत आहे किंवा होते पण आज शासनाने आणि अभियांत्रिकी महाविद्यालय प्रशासनाने गुरुद्वारा श्री लंगर साहिब यांना त्यांच्या हक्कापासून वंचित करण्याचे कारस्थान केलेले आहे. संतबाबा हरनामसिंघजी यांनी नांदेडच्या अनेक शिक्षण संस्थांना सढळ हाताने आर्थिक मदत केली होती. त्यांनी आरोग्य सेवेसाठीही मोठे योगदान दिलेले आहे. त्यांच्या स्मरणार्थ आज ४७ वी बरसी आयोजित आहे.

संत बाबा हरनामसिंघजी यांच्यानंतर गादीवर संतबाबा आत्मासिंघजी मोनी यांनी कार्य सुरु केलं. त्यांनी गुरुद्वारा श्री लंगर साहिब यात्री निवासाच्या विस्ताराकडे लक्ष केंद्रित केले. त्यांना सेवेसाठी अधिक काळ मिळाला नाही, पण आजार अवस्थेत देखील सेवा सांभाळली. सन १९८३ मध्ये त्यांना देवज्ञा झाली. त्यांच्या जागी कारसेवेची परंपरा असलेले संतबाबा शीशासिंघजी यांनी गुरुद्वारा श्री लंगरसाहिबचे मुखी म्हणून जवाबदारी स्वीकारली. संतबाबा आत्मासिंघजी मोनी यांची आज ४३ सालाना बरसी आहे.

संतबाबा शीशासिंघजी करसेवावाले यांनी नांदेडमध्ये काही ऐतिहासिक गुरुद्वारा परिसरात वास्तू निर्माणसेवा सुरु केली. सोबतच गुरुद्वारा श्री लंगर साहिब परिसराच्या विस्तारास त्यांनी सुरुवात केली. गुरुद्वारा भोवतालच्या जमिनी विकत घेऊन त्यांनी मोठ्या आकाराच्या यात्री भवनांचे निर्माण सुरु करण्याची योजना अमलात आणली. या कार्यात संत बाबा नरिंदरसिंघजी कारसेवावाले आणि संत बाबा बलविंदरसिंघजी कारसेवावाले यांची मोलाची सेवा आणि सहकार्य लाभले, म्हणून आज एका सेवासाम्राज्याचे निर्माण नांदेडमध्ये पहायला मिळत आहे. संतबाबा शीशासिंघजी यांनी वर्ष २००५ मध्ये जगाचा निरोप घेतला. आज त्यांची २१ वीं सालाना बरसी आहे.

संतबाबा शीशासिंघजी यांच्या गादीवर वारस म्हणून संतबाबा नरिंदरसिंघजी आणि संत बाबा बलविंदरसिंघजी मागील दोन दशकाहुन अधिक काळ सेवा देत आहेत. त्यांच्या नेतृत्वात गुरुद्वारा श्री लंगर साहिबची कीर्ति सातासमुद्रापलीकडे विस्तारली गेली. नांदेडमध्ये बहुमंजिली यात्री भवनांचे निर्माण त्यांच्यामुळे झाले. त्यांनी सेवाभाव जपत नांदेड शहराला हरित करण्यासाठी ग्रीन सिटी योजना राबवली. सन २०२० मध्ये उद्‌ळवलेल्या कोविड संक्रमण काळात त्यांनी अन्नदानाची भव्य सेवा सातत्याने केली आणि अनेक दिवस सतत केली. लॉकडाउन काळात गुरुद्वाराच्या माध्यमातून त्यांनी रोज लाखो नांदेडकरांसाठी घरपोच लंगरसेवा उपलब्ध करुन दिली होती हे नांदेडकरांच्या नेहमी स्मरणात राहील. पण त्यांच्या सेवेची कोणतीच दखल शासनाने किंवा लोकप्रतिनिधींनीं घेतली नाही याची खंत आहे. दोन्ही बाबाजींनीं केलेली सेवा आणि योगदान कायमचे लक्ष्यात राहील. आज सालाना बरसीनिमित्त सर्व थोर संतमंडळीचे स्मरण आणि प्रणाम!

**–रविन्द्रसिंघ मोदी,**
पत्रकार, नांदेड.
मो. ९४२०६५४५७४

# युवक, शेती आणि आपले भविष्य

शेती ही भारताची आत्मा आहे, असं अनेकदा म्हटलं जातं. पन्नास टक्क्यांहून अधिक भारतीय लोकसंख्या आजही शेतीवर अवलंबून आहे. पण दुर्दैवाने, हीच आत्मा आता मरणासन्न अवस्थेत दिसते आहे. हे चित्र अधिक काळ टिकून राहिलं, तर आपली अन्नसुरक्षा, ग्रामीण अर्थव्यवस्था आणि सामाजिक समतोल मोठ्या संकटात सापडू शकतो.

या पार्श्वभूमीवर संयुक्त राष्ट्राच्या अन्न व कृषी संघटनेचा एक अहवाल आशेचा किरण दाखवतो. 'कृषी-अन्न प्रणालींमध्ये युवकांची स्थिती' या अहवालात स्पष्ट करण्यात आले आहे की, जर युवक शेती आणि अन्न उत्पादन क्षेत्रात सक्रिय झाले, तर जागतिक अर्थव्यवस्था आणि समाजव्यवस्थेचे स्वरूपच बदलू शकते. शेती हा केवळ उदरनिर्वाहाचा मार्ग नसून, जागतिक पातळीवर विकासाचा प्रमुख स्तंभ ठरू शकतो. पण दुर्दैवाने, भारतात परिस्थिती उलटी आहे. युवक शेतीकडे पाठ फिरवू लागले आहेत. कारणं स्पष्ट आहेत वाढती गुंतवणूक, मिळणारा कमी नफा, हवामानावर अवलंबित्व, अनिश्चित उत्पन्न आणि त्यात भर म्हणून सामाजिक प्रतिष्ठेची कमतरता.

तंत्रज्ञानाच्या युगात वाढलेल्या पिढीला सकाळपासून संध्याकाळपर्यंत मातीशी खेळत राहणं आणि अनिश्चित पिकावर अवलंबून राहणं मनास पटत नाही. शिक्षण घेणाऱ्या तरुणांची स्वप्नं आता मल्टीनॅशनल कंपन्यांमध्ये नोकरी मिळवण्याची असतात. कॉर्पोरेट, बँका,



सरकारी क्षेत्र हे करिअरचे केंद्र बनले आहेत. याला दुय्यम कारण म्हणजे गावांतील सुविधा चांगले शाळा, आरोग्य केंद्र, इंटरनेट, वीज, पाणी यांचा अभाव. खरं तर ही परिस्थिती आपणच तयार केली आहे. आपण शेतीला सन्मानित व्यवसाय मानला नाही, शेतकऱ्याच्या कष्टाला बाजारात योग्य किंमत दिली नाही, त्याला विम्याचा सुरक्षित कवच दिलं नाही आणि शेवटी शेतातच उद्योजकता उभी करायची संधीही दिली नाही. मग युवकांनी शेती सोडली तर त्यांना दोष द्यायचा का?

शेतीमध्ये नवसंजीवनी कशी आणता येईल? या प्रश्नाचं उत्तर शेतीच आपले भविष्य आहे, पण तिला भविष्याच्या योग्यतेनं सजवणं आवश्यक आहे. यासाठी शेती फायदेशीर आणि सन्मानजनक व्हावी लागेल. २००४ मध्ये एम.एस. स्वामिनाथन यांच्या अध्यक्षतेखाली कार्यरत असलेल्या राष्ट्रीय शेतकरी आयोगाने स्पष्ट शिफारसी दिल्या होत्या जमिनीचे पुनर्रचना, सिंचन सुलभता, पीकविमा, किमान हमीभाव, साठवणूक व्यवस्था, रोजगार धोरण, अन्नसुरक्षा. पण दुर्दैवाने या शिफारशी राजकीय इच्छाशक्तीअभावी राबवल्या गेल्या नाहीत.

आज गरज आहे ती शेतीला उद्योगाच्या दृष्टिकोनातून पाहण्याची. ॲग्री बिझनेस, अन्न प्रक्रिया, सेंद्रिय शेती, कृषी पर्यटन, स्थानिक ब्रँड तयार करणे, डिजिटल मार्केटिंग यांसारख्या संधी ग्रामीण युवकांसमोर खुल्या आहेत. पण या संधी गावात निर्माण कराव्या लागतील, शहरात नाही. कारण शहरात संधी असतील तर गाव रिकामं होणारच.

आजचं तरुण मन स्मार्ट आहे. त्याला फक्त काम नको, तर कामात स्मार्टनेस हवा. या दृष्टिकोनातून शेतीत ड्रोन, सोलर पंप, सेन्सर, स्मार्ट सिंचन तंत्रज्ञान, ऋब्बड प्रणाली, अचूक हवामान अंदाज यांचा वापर करून युवकांना आकर्षित करता येऊ शकतं. काही तरुणांनी यामध्ये नवे प्रयोगही सुरू केले आहेत. महाराष्ट्र, गुजरात, पंजाब आणि कर्नाटकमधील काही यशस्वी मॉडेल्सनी हे दाखवून दिलं आहे की शेतीत टेक्नॉलॉजी आली, की फायदा आणि आदर दोन्ही मिळतो. तसंच, कौशल्य विकास हाही एक महत्वाचा घटक आहे. जर प्रत्येक जिल्ह्यात कृषि आधारित प्रशिक्षण संस्था आणि ग्रामीण नवउद्यमांसाठी हब तयार करण्यात आले, तर स्थानिक पातळीवर अनेक व्यवसायांची निर्मिती होऊ शकते ज्यात युवकांचा थेट सहभाग असेल.

सरकारने कृषी शिक्षणाला खूप प्रोत्साहन दिलं आहे. हजारो विद्यार्थी कृषी पदवी घेतात, पण नोकरी मिळवण्यासाठी शहरात जातात. कारण शेतीचा व्यवसाय यांना भविष्यदृष्टीनं आशादायक वाटत नाही. म्हणूनच आता धोरणात स्पष्ट बदल हवा शेतकऱ्याला हमीभाव मिळावा, अन्न प्रक्रिया उद्योगांना मदत मिळावी, स्थानिक पातळीवर मार्केटिंग साखळी तयार करावी, डिजिटल प्लॅटफॉर्मचा वापर वाढवावा आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे शेती म्हणजे बेरोजगारांचा पर्याय ही मानसिकता पूर्णपणे मोडून काढावी.

युवकांना शेतीकडे वळवण्याची प्रक्रिया केवळ सरकारी योजना पुरेशी ठरणार नाही. गावगाड्यात बदल घडवण्यासाठी सामाजिक दृष्टीकोन बदलावा लागेल. आपल्या घरातील मुलाने शेतात काम करावं, हे अनेक पालकांनाही मान्य नसतं. ही मानसिकता बदलण्यासाठी, यशस्वी शेतकऱ्यांची उदाहरणं, त्यांची कहाणी, उत्पन्नाच्या नव्या वाटा, त्यांचे जीवनशैलीतील बदल हे समाजासमोर मांडले गेले पाहिजे.

शेवटी, जर खऱ्या अर्थाने 'विकसित भारत' घडवायचा असेल, तर 'विकसित खेडे' घडवावं लागेल. आणि त्याचा पाया आहे शेती. शेती ही नुसती व्यवसायाची वाटच नाही, ती आपल्या संस्कृतीची, पर्यावरणाची आणि अन्नसुरक्षेची खरी मुळं आहे. युवकांच्या नव्या ऊर्जेचा संयोग आणि शेतीचा अनुभव मिळून भारताला एक नवा कृषी युग दाखवता येऊ शकतो. गरज आहे ती धोरणात्मक बदल, तंत्रज्ञानाचा समावेश, सामाजिक सन्मान आणि शेतीसाठी तयार मानसिकतेची. शेती नसेल, तर खाणं नसेल. आणि खाणं नसेल, तर कुठलाही विकास अर्थहीन ठरेल.

**–मच्छिंद्र ऐनापुरे,**
जत जि. सांगली

# हो, वर्तमानाच्या पालखीचा भोई!

एक गर्भश्रीमंत माणूस इतका श्रीमंत होता की, त्याच्या पुढील सात पिढ्या बसून खातील एवढी संपत्ती त्याच्याकडे होती, पण तो नेहमी कुठल्या तरी अनामिक चिंतेत असायचा, म्हणून त्याला कुणीतरी विचारले, की सगळेच असूनही तुम्ही आनंदी दिसत नाही व नेहमी काळजीत दिसता, यावर त्या श्रीमंत माणसाने दिलेले उत्तर आपणाला थक्क आणि आश्चर्यचकीत करणारे आहे.

तो म्हणाला, “माझ्या सात पिढ्या बसून खातील एवढी संपत्ती माझ्याकडे आहे, पण मी आठव्या पिढीचे कसे आणि काय होईल या काळजीत आहे. वरील बाब किती हस्यास्पद वाटते, तरी ती सत्य आहे. आपण आपल्या जवळ काय आहे याचा कधीच विचार न करता किंवा त्याचा उपभोग न घेता, धावत्याचे हात पकडत असतो व आपल्या जवळ असलेले उपभोगायचे विसरून जातो व मग वेळ निघून जाते..

असे म्हणतात की, माणूस हा भविष्याचा गुलाम असतो. म्हणजे तो वर्तमानात खूप कमी जगतो, एक तर तो भूतकाळात घडलेल्या गोष्टी डोक्यात वारंवार गिरवत असतो किंवा भविष्याची निरर्थक काळजी करण्यात हाती असलेला सुवर्ण काळ म्हणजेच वर्तमान गमावून बसतो..आणि हाताने आपल्या पदरात दुख ओढून घेतो...

खरे सुख किंवा आनंद हे वर्तमानात आपल्या हाती काय आहे, ते उपभोगण्यात असते, कारण उद्या आपल्या पुढ्यात काय वाढून ठेवले आहे, हे अनिश्चित असून आपल्या हातातले आजचे वर्तमान हेच निश्चित आणि वास्तव असते...पण हे सगळे सोडून म्हणजे वर्तमानातील आपल्या हातात असलेले आनंदाचे क्षण सोडून आपण फसव्या आणि अनिश्चित असलेल्या भविष्यकाळरुपी मृगजळा मागे धावतो व भविष्यात आपल्या इच्छा-आकांक्षांना तडे जाऊन, आपल्या वर्तमानातील आपल्या हातात असलेले अनमोल क्षण सुद्धा जगण्याचे राहून जातात...

बऱ्याचदा आपल्या आनंदाची किल्ली आपल्या हाती म्हणजे वर्तमानातच असते, पण निरर्थक भविष्याचे ओझे वाहत बसल्याने ती किल्ली आपल्या हाताला लागत नाही व आपली आवस्था तुझं आहे तुझं पाशी, परी तू जागा चुकलासी..अशी होऊन जाते.

द्रोणाचार्य अर्जुनास केवळ आपल्या ध्येयावर म्हणजेच वर्तमानात काय आहे, त्यावर लक्ष केंद्रित करायला सांगतात, व अर्जुन त्यात यश प्राप्त करतो...जगण्याच्या रहाटगाड्यात उगीच भविष्याचे काल्पनिक चित्र रेखाटत बसण्यापेक्षा, आज आपल्या हाती असलेल्या वास्तविक वर्तमानाचा उपयोग घेतला, तर आपल्या मनाला व जगण्याला ही गोष्ट खूप आनंद देऊ शकते... शेवटी हाती असलेले क्षण गमावून येणाऱ्या क्षणांचा विचार करत बसण्यात काय ते हाशिल ? आज हाती असलेले जे काही आनंददायी आहे,

ते उद्या असेलच व ते आल्यावरही, त्याचा आनंद आपल्याला उपभोगता येईलच याची तरी शाश्वती कुठे असते ?
म्हणून, जो जगतो आपला वर्तमान,
भागते त्याच्या आनंदाची तहान...

**–प्रा. अमित शिंदे**
मु. पो. रोहिपिंपळगाव,
ता. मुदखेड, जि. नांदेड.
९७६७८५१०४६.

# किशोर कुमार : हसरा आवाज, बेफिकीर स्वभाव आणि भारतरत्नाची प्रतीक्षा

हिंदी चित्रपटसृष्टीला लाभलेले एकमेव 'अव्वल दर्जाचे अष्टपैलू' म्हणजे किशोर कुमार. गायक, अभिनेता, संगीतकार, गीतकार, निर्माता, दिग्दर्शक. चित्रपट निर्मितीतील जवळपास सर्वच क्षेत्रात त्यांनी आपली मोहर उमटवली.४ ऑगस्ट १९२९ रोजी मध्यप्रदेशातील खांडवा येथे आभास कुमार गांगुली म्हणून जन्मलेला हा मुलगा पुढे जाऊन करोडो लोकांच्या हृदयाचा ठोका बनला. स्वभाव बेफिकीर, बंडखोर पण मनाने माणूस किशोरदा म्हणजे शिस्तीच्या चौकटीत न बसणारा कलाकार. सेटवर कधी उशिरा येणे, कधी गाणे मध्येच थांबवून विनोद करणे, कधी दिग्दर्शकालाच सल्ला



देणे हे त्यांचे वैशिष्ट्य. पण याच बेफिकीरपणामागे एक संवेदनशील माणूस होता. गरजू लोकांना मदत करणे, नवीन कलाकारांना संधी देणे यात ते पुढे. त्यांचा हा 'बिंधास्त' स्वभावच त्यांच्या गाण्यांमध्ये आणि अभिनयात उतरला.

गाण्याविषयी बोलायचे तर प्रत्येक मूडसाठी एक किशोर. किशोर कुमार म्हणजे एका व्यक्तीत अनेक गायक. उदा. रोमँटिक -'ये शाम मस्तानी', 'पल पल दिल के पास'. उदास- 'मेरे नयना सावन भादो', 'एक दिन बिक जाएगा'. मस्ती भरे- 'एक चतुर नार', 'जानेमन जानेमन'. देशभक्तीपर- 'मेरा देश महान'. त्यांचा आवाज हा वाद्य होता. घसा, शिट्टी, हसणे, रडणे सगळे त्यात होते. म्हणूनच आजही ३० वर्षांनंतरही त्यांची गाणी तरुणांच्या प्लेलिस्टमध्ये आहेत. अभिनयात तर कॉमेडीचा बेताज बादशाह होते किशोरदा. 'चलती का नाम गाडी', 'हाफ टिकिट', 'पडोसन' मधील त्यांचा अभिनय म्हणजे अभिनयाची शाळा. चेहरा, हातवारे आणि टायमिंग यांचा अफलातून मिलाफ. विनोदाबरोबर 'आराधना', 'अमर प्रेम' मधील त्यांचा गंभीर अभिनयही तितकाच गाजला.

भारतरत्नाची मागणी- अशा या अष्टपैलू कलाकारा ला भारतरत्न मिळावा अशी संगीतप्रेमींची मागणी आजही कायम आहे. संगीत आणि चित्रपट क्षेत्रातील लता मंगेशकर, उस्ताद बिस्मिल्ला खान, भीमसेन जोशी, सत्यजित रे यांना देशाच्या सर्वोच्च सन्मानाने गौरविण्यात आले. पण गायन, संगीत, लेखन, दिग्दर्शन आणि अभिनय अशा सर्वच आघाड्यांवर झेंडा फडकवणाऱ्या किशोर कुमारांना मात्र अद्याप हा सन्मान मिळालेला नाही. ४ ऑगस्ट २०२६ रोजी त्यांच्या ९७ व्या जयंतीनिमित्त पुन्हा एकदा देशाला विनंती आहे की, या अष्टपैलू कलावंताला 'भारतरत्न' देऊन सन्मानित करावे. ही फक्त एका व्यक्तीची नव्हे, तर करोडो रसिकांची मागणी आहे.कारण किशोर कुमार म्हणजे फक्त एक नाव नाही. तो एक मूड आहे, एक आनंद आहे, एक युग आहे.

**–प्रा. विजय कोष्टी,**
कवठेमहांकाळ, जि. सांगली

# स्वच्छंद आकाशात आवडीनुसार झेप घ्या -शहाजी उमाप

## वैश्य शिक्षक व कर्मचारी महासंघाच्यावतीने गुणवंतांचा सत्कार सोहळा



**नांदेड (प्रतिनिधी)–** प्रामाणिकपणा हा प्रत्येकाने जोपासावा. आपल्या आवडीला महत्त्व देऊन स्वच्छंद आकाशात झेप घ्यावी, अशी मोलाची शिकवण नांदेड परिक्षेत्राचे विशेष पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी गुणवंत विद्यार्थ्यांना दिली.

वैश्य शिक्षक व कर्मचारी महासंघ आणि महिला आघाडी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळा मंगळवार, दि. २ जुलै २०२६ रोजी सिडको येथील वासवी मंगल कार्यालयात उत्साहात संपन्न झाला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते एकनाथराव मामडे उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून विशेष पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप, प्रमुख मार्गदर्शक तेजस चिखलीकर, जिल्हा परिषद नांदेडचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी - सामान्य प्रशासन राजकुमार मुक्कावार, जिल्हा परिषद नांदेडच्या प्राथमिक शिक्षणाधिकारी सौ. वंदना फुटाणे, दैनिक 'गोदातीर समाचार'चे संपादक केशव घोणसे पाटील, महावितरणचे अभियंता संजय नलबलवार, नगरेश्वर विद्यालयाचे अध्यक्ष सुभाष कन्नावार, बालाजी बच्चेवार, गजानन पाम्पटवार, मुखेड नगराध्यक्षा सौ. सारिका अतुल देबडवार यांच्या वतीने प्रतिनिधी, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते सुरेश कोटगिरे आणि साईनाथ मेडेवार आदी मान्यवर उपस्थित होते.

या सोहळ्यासाठी राज्यभरातून इयत्ता १० वी आणि १२ वीमधील ३०० हून अधिक गुणवंत विद्यार्थ्यांनी पालकांसह उत्स्फूर्त नोंदणी करून सहभाग घेतला.

**विद्यार्थ्यांना मार्गदर्शन**

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना शहाजी उमाप म्हणाले, जीवनात यशस्वी होण्यासाठी प्रामाणिकपणा हा सर्वात महत्त्वाचा गुण आहे. आपली आवड ओळखा आणि त्या दिशेने स्वच्छंद आकाशात झेप घ्या. हीच खऱ्या अर्थाने भविष्याची नांदी आहे. यावेळी प्रमुख मार्गदर्शक तेजस चिखलीकर, राजकुमार मुक्कावार, शिक्षणाधिकारी श्रीमती वंदना फुटाणे, संपादक केशव घोणसे पाटील, सुभाष कन्नावार, एकनाथ मामडे आदींनी आपले विचार मांडले.

**सेवानिवृत्तांचा सन्मान**

याच कार्यक्रमात वैश्य शिक्षक महासंघातील नियतवयोमानाने सेवानिवृत्त झालेल्या ३२ शिक्षक-शिक्षकेत्तर बंधू-भगिनींचा मान्यवरांच्या हस्ते शाल, श्रीफळ आणि भेटवस्तू देऊन सपत्नीक सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी स्वागत समिती प्रमुख कैलास दमकोंडवार, नोंदणी प्रमुख सुनील दासावार आणि भोजन समिती प्रमुख सखाहरी पाम्पटवार यांनी विशेष परिश्रम घेतले.


संघटनेचे उपाध्यक्ष विजयकुमार गबाळे, सचिव बालाजी पाम्पटवार, कोषाध्यक्ष संतोष जगळपुरे, उपाध्यक्ष अनिल कोत्तावार, बालाजी कोत्तावार, शशिकांत पाम्पटवार, प्रसिद्धी प्रमुख सुनील मुत्तेपवार, संघटक सुनील मारमवार, दिलीप निलावार, सल्लागार पंडित वटमवार, उमाकांत देशटवार, शंकर पडगिलवार, सतीश राघोजीवार, विजय गादेवार, कपिलेश्वर नलबलवार, भागवत गुडमेवार, विठ्ठल मुत्तेपवार, अरुण तम्मेवार आणि राहुल रुद्रावार, सुनील चिद्रावार यांनी कार्यक्रमासाठी सहकार्य केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बालाजी पाम्पटवार यांनी केले तर आभार सुनील मुत्तेपवार यांनी मानले.

# नांदेड- बिदर रेल्वेसाठी खा. अशोकराव चव्हाण यांची कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांशी चर्चा

**नांदेड (प्रतिनिधी)–** प्रस्तावित नांदेड-बिदर या बहुप्रतिक्षित नवीन रेल्वे मार्गाच्या उभारणीसाठी कर्नाटक सरकारने संमती व आपल्या वाट्याचा निधी द्यावा, अशी मागणी महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण यांनी कर्नाटकचे मुख्यमंत्री डी. के. शिवकुमार यांच्याकडे केली आहे.

संसदेच्या अधिवेशनादरम्यान खा. अशोकराव चव्हाण यांची डी. के. शिवकुमार यांच्याशी भेट झाली. यावेळी त्यांनी या अत्यंत महत्त्वाच्या रेल्वे प्रकल्पावर चर्चा केली व त्यानंतर त्यांना सविस्तर पत्रही पाठवले. याशिवाय, राज्यसभेचे विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे यांच्याकडेही खा. अशोकराव चव्हाण यांनी हीच मागणी केली आहे.



कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांना दिलेल्या पत्रात खा. चव्हाण यांनी म्हटले आहे की, केंद्र सरकारने नांदेड (महाराष्ट्र) आणि बिदर (कर्नाटक) या नवीन रेल्वे मार्गाला केंद्र आणि संबंधित राज्य सरकारांमध्ये ५०:५० खर्च विभागणीच्या तत्त्वावर मंजुरी दिली आहे. हा प्रकल्प सुमारे १५७ किलोमीटरचा असून, त्यातील सुमारे १०० किलोमीटरचा रेल्वे मार्ग महाराष्ट्रात, तर उर्वरित कर्नाटकात आहे.

या नवीन रेल्वे मार्गामुळे नांदेड येथील 'श्री हजूर साहेब' आणि बिदर येथील 'नानक झिरा साहेब' ही शीख समुदायाची दोन अतिशय महत्त्वाची पवित्र तीर्थक्षेत्रे जोडली जाणार आहेत. या थेट कनेक्टिव्हिटीमुळे भाविकांची सुविधा होणार असून, या भागातील पर्यटन, व्यापार आणि रोजगार निर्मितीला गती मिळेल. तसेच नांदेड आणि बंगळुरू दरम्यानचे अंतर लक्षणीयरीत्या कमी होणार आहे, याकडे खा. अशोकराव चव्हाण यांनी डी. के. शिवकुमार यांचे लक्ष वेधले.

महाराष्ट्र सरकारने ५ फेब्रुवारी २०२४ रोजी काढलेल्या शासन निर्णयाद्वारे या प्रकल्पाच्या खर्चातील आपला ५० टक्के वाटा उचलण्यास यापूर्वीच मंजुरी दिली आहे. या प्रकल्पाचे महत्त्व लक्षात घेता, कर्नाटक सरकारनेही यासाठी आवश्यक आर्थिक सहभाग आणि मंजुरी देणे अत्यंत गरजेचे असल्याचे खा. चव्हाण यांनी पत्रात नमूद केले आहे. कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांनी या विषयात वैयक्तिक लक्ष घालावे आणि प्रकल्पाला संमती द्यावी, अशी मागणी खा. अशोकराव चव्हाण यांनी केली आहे.

## स्वराज्य पेंटर संघटनेच्या अध्यक्षपदी सुधाकर पाटील पवार

**लोहा (प्रतिनिधी)–** येथील विश्रामगृह येथे शहरासह तालुक्यातील सकल पेंटर बांधवांची बैठक घेण्यात आली. त्यामध्ये सुधाकर पाटील पवार यांची स्वराज्य पेंटर संघटनेच्या अध्यक्षपदी सर्वानुमते निवड करण्यात आली.

शहरातील शासकीय विश्राम-गृहात दि. २८ जुलै रोजी मंगळवारी दुपारी लोहा शहरासह तालुक्यातील सर्व पेंटर बांधवांची बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीत पेंटर कारागीर मंडळी एकत्र येत पेंटर समुदायावरील अन्याय-अत्याचार, त्यांच्या विविध समस्या, अडचणी व आयत्या वेळेस उद्भवणारे विविध प्रश्न आदी संदर्भात सखोल चर्चा झाली. त्यानंतर तालुक्यातील सर्व पेंटर यांची एकजूट रहावी यासाठी तालुक्यातील पेंटरची संघटना निर्माण करण्याचे ठरविण्यात आली.

# कै. नागोराव जाधव यांच्या विचारांचा वारसा जपणे हीच खरी आदरांजली -शिवाजी जाधव



**नांदेड (प्रतिनिधी)–** शिक्षण महर्षी कै. नागोराव जाधव यांनी ग्रामीण भागात शिक्षणाची ज्योत प्रज्वलित करून हजारो विद्यार्थ्यांचे भविष्य घडवले. त्यांच्या विचारांचा वारसा जपणे हीच त्यांना खरी आदरांजली असल्याचे प्रतिपादन जनता शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष शिवाजी जाधव यांनी केले.

जनता शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष कै. नागोराव जाधव यांच्या २६ व्या पुण्यतिथीनिमित्त नरसिंह विद्यामंदिर उमरदरी येथे आयोजित अभिवादन कार्यक्रमात ते बोलत होते.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उमरदरीचे पोलीस पाटील रामराव पाटील, अजय जाधव, सदाशिवराव पाटील, नरसिंगराव जाधव, ॲड. लक्ष्मण सोमवारे, युवराज चव्हाण, रामदास पाटील, नरसिंग गायकवाड, परमानंद गायकवाड, यादव गायकवाड, सचिन जाधव, गणेश जाधव, बबन पाटील, शादूल होनवडजकर, प्राचार्य सय्यद के. बी., मुख्याध्यापक भंडारे डी. टी. यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमात सर्वप्रथम शिक्षण महर्षी कै. नागोराव जाधव यांच्या समाधीस्थळ व प्रतिमेची मान्यवरांच्या हस्ते पुष्पपूजा करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी जनता शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष शिवाजीराव जाधव, उमरदरीचे पोलीस पाटील रामराव पाटील, सदाशिवराव पाटील, नरसिंग गुरुजी, अजय जाधव, रामदास पाटील आदी मान्यवराची उपस्थिती होती.

# किन्नर गुरूंची जिगळा येथे आखाड पाणी पूजा व मिरवणुकीचे आयोजन

**बिलोली (प्रतिनिधी)–** नांदेड जिल्ह्यातील जिगळा क्र. १, ता. बिलोली येथे मंगळवार, दि. ४ ऑगस्ट २०२६ रोजी किन्नर समाजाच्या धार्मिक परंपरेनुसार आखाड पाणी पूजा, अभिषेक, मिरवणूक व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. या धार्मिक सोहळ्यासाठी देशभरातील संत-महंत, किन्नर गुरू, महामंडलेश्वर तसेच हजारो भाविकभक्त उपस्थित राहणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली.

या धार्मिक सोहळ्यास श्री श्री १००८ श्री महंत उमाशंकर भारतीजी महाराज (काशी), माहूर पीठाधीश्वर श्री श्री १००८ श्री महंत डॉ. धनेश्वर भारतीजी महाराज, श्री श्री १००८ श्री महंत ज्ञानेश्वर भारतीजी महाराज (क्षेत्र माहूर), आंतरराष्ट्रीय किन्नर आखाड्याच्या आचार्य महामंडलेश्वर श्री श्री १००८ डॉ. लक्ष्मीनारायण त्रिपाठी, नांदेडच्या श्री आदी गादीपती किन्नर गुरू रंजीता नायक तसेच महाराष्ट्र राज्य तृतीयपंथी हक्क व कल्याण मंडळाच्या सह-उपाध्यक्षा डॉ. सान्वी जेठवाणी यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. या सर्व मान्यवरांच्या सान्निध्यात हा धार्मिक सोहळा अत्यंत भक्तिमय वातावरणात पार पडणार आहे.

कार्यक्रमाची सुरुवात सकाळी १०.३० वाजता मुख्य अभिषेकाने होणार असून, त्यानंतर संत-महंतांच्या आशीर्वादाने मिरवणुकीस प्रारंभ होईल. या मिरवणुकीमध्ये विविध धार्मिक परंपरांच्या आकर्षक झांकी, भजनी मंडळे, वारकरी संप्रदाय, किन्नर समुदायातील देवकर, महामंडलेश्वर, महंत, विविध आखाड्यांचे प्रतिनिधी तसेच धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रातील अनेक मान्यवर सहभागी होणार आहेत. पारंपरिक वाद्यांच्या गजरात, जयघोष आणि भक्तिमय वातावरणात ही मिरवणूक संपूर्ण परिसरातून मार्गक्रमण करणार आहे.

दरवर्षीप्रमाणे हा आखाड पाणी महोत्सव जिगळा येथे आयोजित करण्यात येत असून, किन्नर विकास परिषद, देवगिरी प्रांतच्या संयोजिका व जिगळा येथील गुरुमाय म्हणून ओळखल्या जाणाऱ्या फरीदा बकश यांच्या पुढाकाराने या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. अनेक वर्षांपासून धार्मिक परंपरा, अध्यात्म आणि सामाजिक समरसतेचा संदेश देणारा हा महोत्सव परिसरातील एक महत्त्वाचा धार्मिक उत्सव म्हणून ओळखला जातो.

यावेळी आयोजकांनी सांगितले की, किन्नर समुदाय हा मंगलमुखी समाज म्हणून ओळखला जातो. सर्व धर्मांचा सन्मान, सर्वधर्मसमभाव, राष्ट्रहित, विश्वशांती, सामाजिक ऐक्य, सर्व समाजाचे कल्याण आणि प्रत्येक कुटुंबाच्या सुख-समृद्धीसाठी विशेष पूजा, अभिषेक व प्रार्थना करण्यात येणार आहे. संपूर्ण मानवजातीच्या कल्याणासाठी, समाजात सौहार्द निर्माण व्हावे, प्रत्येकाच्या जीवनात सुख, शांती आणि समृद्धी नांदावी या उद्देशाने या धार्मिक विधींचे आयोजन करण्यात आले असल्याचे त्यांनी नमूद केले.

किन्नर समुदायाबाबत समाजात असलेल्या गैरसमजुती दूर करून त्यांच्या धार्मिक, सांस्कृतिक आणि आध्यात्मिक परंपरेची माहिती सर्वसामान्यांपर्यंत पोहोचावी, तसेच किन्नर समाजाविषयी सकारात्मक सामाजिक जागृती निर्माण व्हावी, या उद्देशानेही या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असल्याचे आयोजकांनी स्पष्ट केले. किन्नर समुदाय केवळ आशीर्वाद देणारा समाज नसून सामाजिक समरसता, सेवा, अध्यात्म आणि मानवकल्याणाची परंपरा जपणारा समुदाय असल्याचा संदेश या कार्यक्रमातून दिला जाणार आहे.

या दिवशी उपस्थित सर्व भाविकांसाठी महाप्रसादाचेही आयोजन करण्यात आले आहे. सर्व धर्मप्रेमी नागरिकांनी, भाविक भक्तांनी या महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# प्रधानमंत्री पीक विमा भरण्याच्या नावाखाली १२७ शेतकऱ्यांची फसवणूक; १ लाख २७ हजारांचा अपहार

## कृषी अधिकाऱ्याच्या तक्रारीनुसार भोकर पोलिसात गुन्हा दाखल

**भोकर (प्रतिनिधी)–** प्रधानमंत्री पीक विमा योजनेअंतर्गत तालुक्यातील हळदा येथील १२७ शेतकऱ्यांचे पैसे घेऊन पीक विमा भरलाच नाही. बोगस पावत्या दिल्याप्रकरणी १ लाख २७ हजार रू. फसवणूक झाल्याचे सिद्ध झाल्याने हळदा येथील संतोष महादू डोंगरे याच्याविरुद्ध भोकर पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

खरीप हंगाम २०२५-२६ साठी हळदा येथील १२७ शेतकऱ्यांनी पीक विमा रक्कम संतोष महादू डोंगरे याच्याकडे १ लाख २७ हजार रुपये फोन पे डिजिटल स्कॅनरद्वारे शंकर पोशट्टी आरलवाड व इतर शेतकऱ्यांनी भरले. मात्र पीक विमा मंजूर झाल्यानंतर अनेक शेतकऱ्यांना रक्कम मिळालीच नाही. तेव्हा पावत्यावरून चौकशी केली असता बोगस आढळून आल्या. काहींचे नाममात्र भरले होते. चुकीच्या नावाने काही भरले होते.

याप्रकरणी तालुका कृषी अधिकारी भोकर यांच्याकडे तक्रार करण्यात आली. त्यानुसार मंडळ कृषी अधिकारी अविनाश टोम्पे यांनी चौकशी केली असता सदर पावत्या बोगस आढळून आल्या, नावे चुकीची आढळून आली. कमी क्षेत्र भरण्यात आले. याबाबत अहवाल सादर करण्यात आल्याने तालुका कृषी अधिकारी दिलीप जाधव यांनी भोकर पोलिसात फिर्याद दिल्यावरून १ ऑगस्ट २०२६ रोजी भोकर पोलिसात भारतीय न्याय संहिता कलम ३१८(४) ३३६(३) ३४०(१) ३४०(२) ३१६(२) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक विश्वंभर पल्लेवाड यांच्या मार्गदर्शनानुसार पुढील तपास करण्यात येत आहे. पीक विमा रक्कम न भरल्याने शेतकऱ्यांचे १२ लाख ३ हजार ७९० रुपयांचे नुकसान झाल्याचे शेतकऱ्यांनी तक्रारीत म्हटले आहे.

## धम्मगुरू भदंत पंय्याबोधी थेरो यांच्या १७ व्या वर्षावासास प्रारंभ

**नांदेड (प्रतिनिधी)–** येथील अखिल भारतीय भिक्खू संघाचे जिल्हाध्यक्ष तथा धम्मगुरू संघनायक भदंत पंय्याबोधी थेरो यांच्या १७ व्या वर्षावास काळास आषाढ पौर्णिमेचे औचित्य साधून तालुक्यातील खुरगाव-नांदुसा परिसरातील श्रामणेर प्रशिक्षण केंद्रात प्रारंभ करण्यात आला. याबरोबरच त्यांचे शिष्य श्रामणेर भिक्खु शीलधम्मो, भिक्खु श्रध्दानंद, भिक्खु सारिपुत्त, भिक्खु सुबोधी यांचा पहिला वर्षावास अधिष्ठान प्रारंभ करण्यात आला.

तालुक्यातील खुरगाव-नांदुसा परिसरातील श्रामणेर प्रशिक्षण केंद्रात भदंत पंय्याबोधी थेरो यांच्या १७ व्या वर्षावास अधिष्ठान कार्यक्रमास प्रारंभ करण्यात आला. बुद्धगया येथे महाबोधी विहाराच्या विपश्यना केंद्रामध्ये भदंत डॉ. उपगुप्त महाथेरो, भदंत प्रज्ञादीप महाथेरो आणि देशोदेशीच्या १२ भिख्खूंसह महाराष्ट्रातील २३० बौद्ध भिक्षू उपासक-उपासिकांच्या उपस्थितीत भदंत पंय्याबोधी थेरो यांची १४ नोव्हेंबर २००९ रोजी ब्रम्हदेश येथील भदंत चंद्रबोधी महास्थवीर यांच्या हस्ते उपसपंदा करण्यात आली होती. पंय्याबोधी यांचा तेव्हापासून अखंड वर्षावास सुरू आहे. आषाढ पौर्णिमेला हा वर्षावास सुरू होऊन आश्विन पौर्णिमेला तो समाप्त होईल.

# ज्येष्ठांसाठी १५ कलमी हक्क चार्टर लागू करा; डॉ. हंसराज वैद्य यांची मागणी

**नांदेड (प्रतिनिधी)–** ज्येष्ठ नागरिकांना सन्मानाने, सुरक्षिततेने आणि अधिकारपूर्वक जीवन जगण्याची हमी मिळावी, यासाठी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते, साहित्यिक तथा उत्तर मराठवाडा प्रादेशिक विभाग फेस्कॉम नांदेडचे अध्यक्ष डॉ. हंसराज वैद्य यांनी केंद्र व राज्य शासनाकडे १५ कलमी 'ज्येष्ठ नागरिक हक्क चार्टर' तातडीने लागू करण्याची मागणी केली आहे.



गुरुपौर्णिमेनिमित्त त्यांनी देशातील सर्वोच्च संवैधानिक पदांवर निवेदन पाठवून ज्येष्ठांच्या प्रश्नांकडे सामाजिक न्याय आणि घटनात्मक अधिकारांच्या दृष्टीने पाहण्याचे आवाहन केले आहे.

डॉ. वैद्य यांनी निवेदनात म्हटले आहे की, जागतिक निकषांनुसार ६० वर्षे हेच ज्येष्ठ नागरिकांचे वय मान्य करून २००७ चा ज्येष्ठ नागरिक कायदा, २०१० चे नियम आणि २०१३ चे राष्ट्रीय धोरण यांची प्रभावी अंमलबजावणी करावी. ज्येष्ठांना सन्मानाने जगण्याचा अधिकार हा भारतीय संविधानातील अनुच्छेद २१ व ४१ च्या भावनेशी सुसंगत आहे, असे त्यांनी नमूद केले.

'लाडकी बहीण' योजनेच्या धर्तीवर 'लाडके मायबाप योजना' सुरू करून आर्थिकदृष्ट्या पात्र ज्येष्ठ नागरिकांना दरमहा किमान ५ हजार रुपये मानधन देण्यात यावे, कुटुंब, समाज व देशाचा आधारस्तंभ असलेल्या ज्येष्ठ नागरिकांना 'राष्ट्रीय संपत्ती' म्हणून घोषित करावे, विधान परिषद व राज्यसभेवर फेस्कॉम पदाधिकाऱ्यांमधून एक महिला व एक पुरुष यांची नियुक्ती करावी, ज्येष्ठ नागरिक महामंडळ कार्यान्वित करून त्यावर फेस्कॉम व फेस्कॉम प्रादेशिक विभागातून किमान ५०% प्रतिनिधी घेण्यात यावेत, स्वतंत्र ज्येष्ठ नागरिक कल्याण मंत्रालय आणि महाराष्ट्र राज्य ज्येष्ठ नागरिक आयोग स्थापन करावा, आदी मागण्या करण्यात आल्या आहेत.

# दर्ग्याचे नायब मुतवल्ली हत्या प्रकरण: कटाचा मुख्य सूत्रधार मिर्झा शब्बर बेग जेरबंद; स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

**नांदेड (प्रतिनिधी)–** शहरात खळबळ उडवून देणाऱ्या सय्यद रहमान दुल्हेशाह दर्ग्याचे नायब मुतवल्ली शेख शमीम शेख इसाक यांच्या हत्या प्रकरणाचा तपास आता निर्णायक वळणावर पोहोचला आहे. स्थानिक गुन्हे शाखेच्या कारवाईनंतर दर्ग्याचे नायब मुतवल्ली हत्या प्रकरणातील मुख्य आरोपीला जेरबंद केले आहे.



पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या आदेशानुसार शहर उपविभागीय पोलीस अधिकारी रामेश्वर व्यंजने यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अतुल भोसले व त्यांच्या सहकाऱ्यांनी या कटाचा मुख्य मारेकरी आणि १३ वा आरोपी मिर्झा शब्बर बेग मिर्झा गफ्फार बेग (वय ३६) याला आज अटक केली आहे. या अटकेमुळे प्रकरणाचा मुख्य सूत्रधार समोर आला असून तपासाला मोठी गती मिळण्याची शक्यता आहे.

ही भीषण घटना २१ जून २०२६ रोजी मध्यरात्री २ वाजेच्या सुमारास वाघी रोड परिसरात घडली होती. शेख शमीम हे आपल्या मित्रासोबत बसलेले असताना हल्लेखोरांनी त्यांच्यावर प्रथम पिस्तुलातून गोळ्या झाडल्या. त्यानंतर तलवार व खंजीराने शरीरावर असंख्य वार केले. या हल्ल्यात शेख शमीम यांचा जागीच मृत्यू झाला होता.

या घटनेमुळे दर्गा परिसर आणि संपूर्ण नांदेड शहरात भीतीचे वातावरण पसरले होते.

घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन वजिराबाद पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला होता. यापूर्वी पोलिसांनी प्रत्यक्ष हल्ला करणाऱ्या ४ जणांसह एकूण १० आरोपींना अटक केली होती. त्यामध्ये अब्दुल तौखीर, शेख सादिक, शेख नजीर, रियाज सलीम आणि जुबेर खान या पाच जणांचा समावेश आहे.

पोलिसांनी यापूर्वीच सांगितले होते की, या हत्येमागील मुख्य हेतू आणि सूत्रधार लवकरच स्पष्ट होईल. मिर्झा शब्बर बेग याच्या अटकेमुळे या गुन्ह्यातील 'मास्टरमाईंड' पोलिसांच्या ताब्यात आला आहे. त्याच्या चौकशीतून या हत्येमागील नेमका कट कसा रचला गेला आणि यामध्ये आणखी कोणाचे हात आहेत, हे आता उघड होणार आहे.

उपविभागीय पोलीस अधिकारी (शहर) रामेश्वर व्यंजने हे या प्रकरणाचा पुढील सखोल तपास करत आहेत. शमीम यांच्या हत्येनंतर त्यांचे कुटुंब उद्ध्वस्त झाले असून, आता मुख्य आरोपीला अटक झाल्यामुळे त्यांना न्याय मिळण्याच्या आशा बळावल्या आहेत.

**पान १ वरून...**

**महापालिकेकडून ईदगाह कमान...**

करत मोठ्या प्रमाणावर बेकायदेशीर ताबा मिळवला होता. यामुळे या रस्त्याच्या रुंदीकरणाच्या कामात अडथळा निर्माण होत असल्याने सार्वजनिक बांधकाम विभागाने महापालिकेस केलेल्या पत्रव्यवहारानुसार आज मनपाच्या अतिक्रमण हटाव पथकाने या संपूर्ण मार्गावरील १० ते १५ घरांची पक्की बांधकामे, अनधिकृत शेड्स, आणि दुकानांचे वाढीव भाग हटवून अतिक्रमित भाग पूर्णपणे मोकळा केला आहे.

केवळ बायपास रस्ताच नव्हे, तर मनपा हद्दीतील इतरही प्रमुख भागांत ही धडक मोहीम राबवण्यात आली. यामध्ये प्रामुख्याने वजिराबाद भागातील तिरंगा चौकातील रस्ते आणि पदपथांवर अनधिकृतपणे थाटलेली दुकाने व व्यावसायिक अडथळे हटवण्यात आले. तसेच जुन्या नांदेड भागातील मॅफको रोड येथे सुध्दा कारवाई करण्यात आली.

या कारवाईदरम्यान कोणताही कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. काही ठिकाणी अतिक्रमणधारकांनी प्रशासकीय कामात अडथळा आणण्याचा किंवा हुज्जत घालण्याचा प्रयत्न केला; परंतु पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप करत परिस्थिती नियंत्रणात आणली. सदरील कारवाई अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम व उपआयुक्त अजितपालसिंघ संधु यांच्या निर्देशानुसार अतिक्रमण विभागाचे सहाय्यक आयुक्त रावण सोनसळे, अतिक्रमण पथक प्रमुख दत्ता कल्याणकर, विशाल सोनकांबळे यांच्यासह अनधिकृत बांधकाम व अतिक्रमण विभाग व पोलीस प्रशासनाच्या संयुक्त पथकाने ही कारवाई पार पाडली.

------------

**दर्जेदार नाट्य महोत्सवांचे...**

प्रास्ताविकात स्वप्नरंग सांस्कृतिक संस्थेचे अध्यक्ष दिनेश कवडे यांनी महोत्सवामागील भूमिका, उद्देश आणि भविष्यातील वाटचालीची माहिती दिली. नाट्यकलेचे संवर्धन आणि विविध भागांतील रंगकर्मी एकत्र आणण्यासाठी अशा महोत्सवांची आवश्यकता असल्याचे त्यांनी सांगितले. महानगरपालिका आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांनी अशा सांस्कृतिक उपक्रमांना महानगरपालिकेचे सहकार्य कायम राहील, अशी ग्वाही दिली. उपमहापौर दीपकसिंग रावत यांनी हा महोत्सव दरवर्षी आयोजित व्हावा आणि मराठवाड्यातील कलावंतांचा अधिकाधिक सहभाग असावा, अशी अपेक्षा व्यक्त केली.

उद्घाटक डॉ. विजयकुमार माहुरे यांनी नांदेडची रंगभूमी अधिक गतिमान करण्यासाठी अशा नाट्य महोत्सवांची नितांत गरज असल्याचे सांगितले. शासनाने सातत्याने कलावंतांच्या पाठीशी उभे राहून अशा उपक्रमांना प्रोत्साहन द्यावे, असेही त्यांनी नमूद केले. यावेळी स्वप्नरंग नाट्य प्रशिक्षण कार्यशाळा यशस्वीरीत्या पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले.

उद्घाटनानंतर माणूस फाऊंडेशन, मुंबई प्रस्तुत डॉ. सोमनाथ सोनवलकर लिखित व दिग्दर्शित अलेक्झांडर व्हाया डायोजेनिस या दर्जेदार मराठी नाटकाचा प्रयोग सादर करण्यात आला. कलाकारांच्या प्रभावी अभिनयाला नाट्यरसिकांनी उत्स्फूर्त दाद दिली.

महोत्सवात ४ ऑगस्ट रोजी सायंकाळी ७ वाजता व्यक्ती, पुणे प्रस्तुत धनंजय सरदेशपांडे लिखित फारच टोचलं, रात्री ८.३० वाजता खुपसा डायरी आणि रात्री ९.३० वाजता नाट्यस्पंदन, लातूर प्रस्तुत आनंद ओवरी या नाट्यप्रयोगांचे सादरीकरण होणार आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुरलीधर हंबर्डे यांनी केले. महोत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी सुधांशू सामलेटी, किरण कवडे, गौतम गायकवाड, शांती देसाई आणि संदेश महाबळे यांनी समन्वयक म्हणून काम पाहिले.

--------------

वर्गमित्रावरच प्राणघातक हल्ला...

वाजेच्या सुमारास इयत्ता दहावीतील महावीर गोविंद धुमाळ (वय १६, रा. धुमाळवाडी) याच्याशी त्याचे वर्गमित्र युवराज वाघमारे (वय १५, रा. कोटीतीर्थ) आणि ओमकार मुंजाजी कदम (वय १६, रा. थुगाव) यांच्याशी शाळेच्या आवारात वाद झाला. त्यानंतर तिघेही शाळेजवळील शिव-गणेश मंदिराच्या पाठीमागे गेले. तेथे दोन्ही विद्यार्थ्यांनी महावीर धुमाळ याच्यावर चाकूने गळा, पोट तसेच शरीराच्या इतर भागांवर वार केल्याची माहिती पोलिसांनी दिली.

घटनेची माहिती मिळताच नांदेड ग्रामीणचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर व त्यांचे सहकारी तातडीने घटनास्थळी पोहोचले. दोन्ही अल्पवयीन आरोपींना चाकूसह ताब्यात घेतले. जखमी विद्यार्थ्याला तातडीने विष्णुपुरी येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, त्याच्यावर उपचार सुरू आहेत. घटनास्थळी पुरावे संकलित करण्यासाठी मोबाईल फॉरेन्सिक पथकालाही पाचारण करण्यात आले होते. विष्णुपुरी शासकीय रुग्णालयातही पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला असून, या प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे. वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनीही घटनास्थळाची पाहणी करून जखमी विद्यार्थ्याची विचारपूस केली.

स्मार्ट शेतकरी, स्मार्ट शेती

# शिवार



# चला द्राक्ष बागेत कलम करण्याची वेळ झाली...

**नवीन द्राक्ष बाग उभारताना खुंट खूप महत्त्वाची भूमिका बजावतात. खुंटांची लागवड ही फेब्रुवारी ते मार्च महिन्यामध्ये केली जाते. त्यानंतर जमिनीमध्ये खुंट रोपांच्या मुळांचा विकास व नवीन फुटींचा विकास पाच ते सहा महिन्यांच्या कालावधीमध्ये होतो. वातावरणातील ३० अंश सेल्सिअसपेक्षा जास्त तापमान व ८० टक्क्यांपेक्षा जास्त आर्द्रता ही स्थिती खुंटाच्या वाढीसाठी तसेच कलम करण्यासाठी फायदेशीर असते. प्रामुख्याने ऑगस्ट ते सप्टेंबर अखेरपर्यंतचा कालावधी द्राक्ष बागेत कलम करण्यासाठी योग्य मानला जातो. मात्र सततच्या पावसामुळे कलम करण्यास विलंब होऊ शकतो. कलम काडी आणि खुंट काडीची निवड करताना काही बाबी लक्षात ठेवणे आवश्यक आहे...**

## खुंटकाडीची कलम करण्यापूर्वीची तयारी

बागेत खुंटरोपाच्या बऱ्याच फुटी निघालेल्या दिसून येतील. या फुटींमध्ये काही बारीक, जाड, परिपक्व व तसेच अर्ध परिपक्व किंवा कोवळ्या काड्याही असतील. बागेतील प्रत्येक कलम यशस्वी होण्याकरिता प्रत्येक खुंटाच्या दोन काड्यांवर कलम केले जाते. या वेळी कलम करताना काडीची निवड सोपी व्हावी म्हणून प्रत्येक खुंटरोपाच्या तीन काड्या राखाव्यात. अतिरिक्त काड्या काढून टाकाव्यात. कलम करतेवेळी सर्वांत महत्त्वाचे म्हणजे काडी रसरशीत असावी. मात्र काही परिस्थितीमध्ये अशी काडी मिळवणे शक्य होत नाही. तेव्हा कलम सुरू करण्याच्या ४-५ दिवसांपूर्वी बागेत पाणी द्यावे. यामुळे काडीमध्ये रस तयार होण्यास मदत होईल.

## खुंटांवरील रोग, कीडनियंत्रण

सतत पावसामुळे काही वेळा जुन्या पानांवर तांबेरा रोगाचा प्रादुर्भाव आढळून येतो. यामध्ये पानांच्या मागील बाजूस तांबूस पावडरचा थर दिसून येते. त्यावरील जिवाणूंमुळे पानांमधील रस शोषला जातो. देठ व पानांमधील मजबुती कमी होऊन पान गळून पडते. यामुळे काडीमध्ये रस कमी पडतो. कलम जोडणीमध्ये अडथळा येतो. या रोगाच्या नियंत्रणासाठी क्लोरोथॅलोनील १.५ ग्रॅम प्रति लिटर या प्रमाणे फवारणी करता येईल.

## खुंटकाडीची निवड

- खुंट काडीची निवड करताना काडीची जाडी आठ ते दहा मि. मी. (पेन्सिल साइज) असावी.
- खुंटकाडी रसरशीत असावी.
- खुंटकाडीची उंची जमिनीपासून सव्वा फूट असावी.
- खुंटकाडीची वाढ जोमदार, सरळ व सशक्त असावी.
- खुंटकाडी ही अर्ध परिपक्व असावी.
- खुंटकाडी कीड व रोगमुक्त असावी.
- काडी निवडताना बऱ्याच वेळा हवी तशी काडी मिळत नाही, त्यासाठी चार ते पाच दिवस अगोदर बागेत पाणी द्यावे. त्यामुळे काडीमध्ये रस तयार होऊन कॅम्बिअम म्हणजेच झायलम आणि फायलम दरम्यानचा एक पेशींचा थर चांगला तयार होतो. कलम यशस्वी होण्यास मदत होते.

## द्राक्ष पिकातील कलम वर्षभर यशस्वी करण्याचे तंत्र

- रंगीत द्राक्षजाती : फ्लेम सीडलेस, क्रीमसन सीडलेस, रेड ग्लोब, फँटसी सीडलेस, शरद सीडलेस या द्राक्ष जातींना आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत चांगली मागणी आहे.
- लांब मण्याच्या रंगीत द्राक्षजाती : क्रिश्ना सीडलेस, सरिता सीडलेस, ज्योती सीडलेस आदी.
- हिरव्या द्राक्षजाती : मांजरी नवीन, मांजरी किशमिश, थॉमसन सीडलेस, तास-ए-गणेश आदी जातींचा वापर आपण खाण्यासाठी तसेच बेदाणा बनविण्यासाठी उपयोग करू शकतो.
- हिरव्या लांब मण्याच्या द्राक्षजाती : सोनाका, माणिक चमन, सुपर सोनाका, आर.के.ई.

## कलम करणे...

- सर्वांत महत्त्वाचे म्हणजे कलम करणारी व्यक्ती कलम करण्यात तरबेज असली पाहिजे.
- कलम करण्याअगोदर कलमकाडी कार्बेन्डाझिम ३ ते ४ ग्रॅम प्रति लिटर पाणी या द्रावणात बुडवून घ्यावी. यामुळे काडीवरील रोगाचा प्रादुर्भाव कमी होतो.
- कलम करताना खुंट व कलमकताडीची जाडी सारखी असायला हवी. नसल्यास कोणत्याही एका बाजूने ती व्यवस्थित जुळवून घ्यावी, त्यामुळे कॅलस फॉर्मेशन चांगले होईल. कलम यशस्वी होण्याची शक्यता वाढते. कलम केल्यानंतर कलम काडीमधून रस प्रवाहित होत असल्यास असे कलम यशस्वी होण्याची जास्त शक्यता असते.
- कलम करतेवेळी कलम काडीला पाचर करताना एका बाजूला एकाच वेळी चाकूचा वापर करावा. वारंवार चाकूचा वापर केल्यास काडीला इजा होऊ शकते.
- कलम केलेल्या ठिकाणी पॉलिथिन योग्य प्रकारे व पक्क्या स्वरूपात बांधावे. बांधणी करताना नैसर्गिकरीत्या कुजणाऱ्या जैवविघटनशील पट्ट्या (बायोडिग्रेडेबल स्ट्रीप्स) वापराव्यात.
- कलम केल्यानंतर खुंट योग्य प्रकारे बांबूला बांधून घ्यावा. कलम केलेल्या ठिकाणी कुठलीही इजा पोहोचणार नाही, याची काळजी घ्यावी.
- कलम केल्यानंतर खुंटावरील अतिरिक्त फुटवे काढून टाकावे.
- कलम यशस्वी झाल्यानंतर सुरुवातीच्या काळात फुटींवर येणाऱ्या रोग व किडींच्या नियंत्रणावर विशेष लक्ष देणे गरजेचे असते. उदा. केवडा (डाऊनी मिल्ड्यू), अळी, उडद्या व अन्य रस शोषक किडी आदी.



## कलम अयशस्वी होण्याची कारणे



- कलमकाडी निवडताना एक समान व योग्य आकाराच्या काडींची उपलब्धता न झाल्यामुळे खुंट व कलमकाडीमध्ये योग्य मिलाप होत नाही. कलम अयशस्वी होते.
- निवडलेल्या कलमकाडीवरील डोळे मृत असल्यास कलम यशस्वी होत नाही.
- कलम करतेवेळी खुंटकाडी व कलमकाडी यामधील आतील गराचा भाग आणि बाजूचा सालीचा भाग (फ्लोयम टू फ्लोयम आणि झायलम टू झायलम) योग्य प्रकारे जुळणे गरजेचे असते. असे न झाल्यास कलम अयशस्वी होते.
- बागेत खुंट लावलेला असताना काही शेतकरी आंतरपीक म्हणून उडीद, मूग आणि भुईमूग यांसारखी पिके घेतात. या पिकांमध्ये काही शेतकरी प्रोपिकोनॅझोल सारख्या बुरशीनाशकांचा वापर करतात. त्याचे तुषार खुंटावर उडाल्यास खुंटाच्या वाढीवर परिणाम होतो. तसेच एकसारख्या फुटी मिळत नाहीत. त्यामुळे आंतरपिकावरही अशी फवारणी शक्यतो टाळावी.

# वेलवर्गीय भाजीपाला पिकांवरील रोगनियंत्रण

**वेलवर्गीय भाजीपाला पिकांमध्ये येणाऱ्या विविध रोगांचे प्रमाण खरिपामध्ये अधिक असते. या रोगांच्या नियंत्रणासाठी वेळीच उपाययोजना करण्याची आवश्यकता असते.**



## ✓ विषाणूजन्य रोग

- रोगांची नावे : मोझॅक, ग्रीन मोटल मोझॅक, यलो व्हेन मोझॅक, नेक्रॉसीस व्हायरस आणि फायलोडी आदी.
- पिके : काकडी, भोपळा, खरबूज, कलिंगड, कारली, घोसाळी आणि दोडका
- प्रसार : कुकुंबर मोझॅक विषाणूचा प्रसार मावा या किडीमुळे होतो. हा विषाणू माठ, रानपोपटी, कांगुणी या गवतावर तसेच टोमॅटो, मिरची, वांगी, पालक, चवळी, गाजर या सहजीवी पिकांवर असतो. कलिंगड आणि भोपळा यावरील कुकुंबर ग्रीन मोटल मोझॅक व्हायरसचा प्रसार संसर्ग आणि बियाणेद्वारे होतो. तसेच हा रोग चंदन बटवा, धोतरा या गवतावर आणि काकडी, खरबूज, कलिंगड, भोपळा या सहजीवी पिकांवर असतो. कारली, खरबूज, कलिंगड, भोपळा यावरील मोझॅक विषाणू स्पर्श आणि मावा किडींमार्फत पसरतो. यलोव्हेन मोझॅक पांढरीमाशी आणि स्पर्शाने तर कलिंगडामधील वॉटरमेलॉन बड नेक्रोसीसचा प्रसार फूलकिडे आणि स्पर्शाने होतो. कुकुरबीट फायलोडीचा प्रसार तुडतुडे या किडीमार्फत होतो.
- लक्षणे : विशेषतः नवीन पानावर हिरवट डाग दिसून येतात व पानाचा इतर भाग पिवळसर दिसतो. यामुळे पाने वाकडी होवून गुंडाळली जातात. ती लहान होतात. पानाच्या शिरा पिवळसर होतात. कांडे आखूड राहते. नवीन फळे वेडी-वाकडी, लहान, हिरवट-पिवळसर आणि राठ दिसतात. झाडाची वाढ खुंटते. फुले-फळे कमी प्रमाणात लागतात.कलिंगड पिकामध्ये वॉटरमेलॉन बड नेक्रॉसीस व्हायरसमुळे वेलीचा शेंडा तपकिरी पडून शेवटी काळा होतो आणि वेल जळते. वेलीवर शेंड्याकडून खोडकडे तपकिरी रोगाचे चट्टे पडतात. या रोगाचा प्रादुर्भाव फळांवर येवून त्यावर सुद्धा गोलाकार वर्तुळे दिसतात.कुकुरबीट फायलोडीमुळे वेलवर्गीय पिकाचे कांडे आखूड राहते. फुले हिरवट पानासारखी दिसतात. प्रादुर्भाव झालेल्या वेलींना फळे लागत नाही.
- उपाय : विषाणूजन्य रोग असलेल्या सहजीवी पिकांचा नायनाट करावा. निरोगी झाडांवरील फळांचे किंवा प्रमाणित बी वापरावे. रोगांचा प्रसार करणाऱ्या किडींचे कीडनाशक वापरून वेळीच नियंत्रण करावे. रोगट झाडे दिसताच त्यांचा उपटून नायनाट करावा.

## ✓ कवडी अथवा काळा करपा (ॲन्थ्रॅकनोज)

- पिके : मुख्यतः काकडी, कलिंगड, खरबूज, दुधी भोपळा आणि कारली.
- रोगकारक बुरशी : कोलिटोट्रीम लाजेनॅरियम (पूर्णावस्था - ग्लोमेरेल्ला सिन्गुलाटा)
- रोगाचा प्रसार : प्रथम प्रादुर्भाव रोगग्रस्त अवशेष आणि बियाण्यांमार्फत होतो.
- लक्षणे : बहुतांश वेलवर्गीय भाज्यांमध्ये पानावर पानथळ, लहान, पिवळसर आणि नंतर तपकिरी ठिपके पडतात. रोगग्रस्त पाने करपतात. पानांचे देठ आणि वेलीवर रोगाचे ठिपके पडून पाने व वेली सुकून वाळतात. खरबूज आणि कलिंगड या पिकांच्या पानावर ओलसर तपकिरी - काळ्या रंगाचे ठिपके पडतात. खरबूज, कलिंगड फळांवर खोलगट आणि काळ्या कडा असलेले खडबडीत ठिपके पडतात. ढगाळ हवामानात या ठिपक्यांवर गुलाबी बुरशीची वाढ होते. तसेच लालसर डिंकासारखा द्रव पाझरताना दिसतो. रोगाचा प्रादुर्भाव प्रामुख्याने जादा आर्द्रता किंवा पावसामुळे होतो.
- उपाय : पिकाची फेरपालट करावी. रोगविरहित फळांचे बी वापरावे.जमीन उत्तम निचरा होणारी असावी. पिकाची लागवड मंडप अथवा ताटी पद्धतीने करावी. वेलीचा संपर्क जमिनीशी येणार नाही. रोगाची लक्षणे दिसताच रोगग्रस्त पाने, फळे काढून नष्ट करावी. पीक संपल्यानंतर वेली काढून नष्ट कराव्यात.
- बीजप्रक्रिया : कार्बेन्डाझिम २.५ ते ५ ग्रॅम प्रतिकिलो. रोगाची लक्षणे दिसताच किंवा लागवडीनंतर ४५ दिवसांनी, (फवारणी प्रतिलिटर पाणी) मँकोझेब अथवा क्लोरोथॅलोनील किंवा कॅप्टन किंवा कॉपर ऑक्झी क्लोराईड प्रत्येक २.५ ग्रॅम किंवा कार्बेन्डझिम प्रत्येक १ ग्रॅम. पुढील फवारणी आवश्यकतेनुसार बुरशीनाशक बदलून घ्यावी.

## डिंक्या रोग

- पिके : दुधी भोपळा, खरबूज, घोसाळी, काकडी
- रोगकारक बुरशी : डायडीमेला ब्रायोनिआ
- प्रादुर्भाव व प्रसार : बियाणे आणि जमिनीतून.
- लक्षणे : वेलीच्या कांड्याच्या भागात पिवळसर तपकिरी रंगाचा डिंकासारखा द्रव पाझरतो व नंतर तो काळ्या रंगाचा होतो. खोड आणि फळे यावर चिरा पडतात, त्यामुळे वेल वाळतो. फळे सडतात. संकरित वाणावर रोगाचे प्रमाण जास्त आढळून येते.
- उपाय : पिकाची फेरपालट करावी. रोगविरहित फळाचे बी वापरावे. खोल नांगरट करून पिकांचे अवशेष (रोगग्रस्त वेली) पीक संपल्यानंतर नष्ट करावेत. जमिनीत हिरवळीचे खत आणि ट्रायकोडर्माचा उपयोग करावा.
- बीजप्रक्रिया : कार्बेन्डॅझिम ३-५ ग्रॅम प्रति किलो. रोगाची लक्षणे दिसताच, फवारणी प्रति लिटर पाणी बेनोमील किंवा कार्बेन्डॅझिम किंवा थायोफिनेट मेथिल प्रत्येक १ ग्रॅम. पुढील फवारणी आवश्यकतेनुसार बुरशीनाशक बदलून करावी.

## भुरी

- पिके : काकडी, कलिंगड, खरबूज, कारली, दुधी भोपळा, तांबडा भोपळा आणि दोडका आदी.
- रोगकारक बुरशी : जवळजवळ सर्वच वेलवर्गीय पिकांमध्ये ईरीसीफी सीकोरेसीआरम, तर कलिंगड, खरबुजामध्ये स्फिरोथीका फुलीजीना बुरशीमुळे हा रोग होतो.
- लक्षणे : रोगाची सुरवात प्रथम जुन्या पानापासून होते. पानाच्या दोन्ही पृष्ठभागांवर पिठासारखी पांढरी बुरशी वाढते. प्रादुर्भाव झालेली पाने पिवळी पडून करपतात आणि वेली वाळतात. रोगाचा प्रादुर्भाव जास्त झाल्यास या बुरशीमुळे पाने भुरकट पडतात. हा रोग देठ, खोड आणि फळांवरही पसरतो. यामुळे वेलींची वाढ खुंटते.



- उपाय : भुरी रोगाची लक्षणे दिसताच, फवारणी प्रतिलिटर पाणी डिनोकॅप किंवा ट्रायडेमॉर्फ ०.५ ते १ ग्रॅम/मिलि किंवा कार्बेन्डाझिम १ ग्रॅम किंवा हेक्झाकोनॅझोल २ मि.लि. पुढील फवारणी आवश्यकतेनुसार ८-१० दिवसांच्या अंतराने बुरशीनाशक बदलून करावी.

## केवडा (डाऊनी मिल्ड्यू)



- पिके : काकडी, कलिंगड, खरबूज, कारली, दुधी भोपळा, तांबडा भोपळा, दोडका, घोसाळी, पडवळ आदी.
- रोगकारक बुरशी : सुडोपेरानोस्पोरा कुबेन्सीस.
- लक्षणे : सुरुवातीला पानाच्या वरच्या वाजूला फिक्कट हिरवट-पिवळसर रंगाचे ठिपके दिसतात. ढगाळ वातावरणात या ठिपक्यांच्या खालील बाजूला जांभळट रंगाच्या बुरशीची वाढ झालेली दिसते. नंतर हेच जांभळट डाग पांढरे-काळे किंवा राखाडी होतात. विशेषतः पूर्ण वाढ झालेल्या पानांवर रोगाचा प्रादुर्भाव जास्त आढळतो. तीव्र प्रादुर्भावामध्ये पानाचे देठ, बाळ्या, फांद्यावरही आढळतो. प्रादुर्भाव झालेली पाने करपतात व गळून पडतात. रोगग्रस्त वेलींना फुले-फळे कमी प्रमाणात व लहान आकाराची लागतात. त्यांचा दर्जा कमी आणि बेचव असतो. वेली लवकर सुकतात. परिणामी उत्पादनात मोठी घट होते.
- उपाय : जमीन उत्तम निचरा होणारी असावी. योग्य अंतरावर पिकाची लागवड करावी. रोगप्रतिकारक जातींचा उपयोग करावा.
- बीज प्रक्रिया : मेटॅलॅक्झिल (३५%) ६ ते ७ ग्रॅम प्रति किलो बियाणे. पिकाची लागवड ताटी किंवा मंडप पद्धतीने करावी. खेळती हवा, भरपूर सूर्यप्रकाश यामुळे रोगाचे प्रमाण कमी राहते. रोगांची लक्षणे दिसताच रोगग्रस्त पाने काढून नष्ट करावीत.
- प्रतिबंधक उपाय : (फवारणी प्रतिलिटर पाणी) क्लोरोथॅलोनील २.५ ग्रॅम किंवा मॅंकोझेब २.५ ग्रॅम किंवा कॉपर ऑक्झिक्लोराईड २.५ ग्रॅम - उगवण झाल्यानंतर २० दिवसांपासून दर ८-१० दिवसांच्या अंतराने.
- नियंत्रणात्मक उपाय :(फवारणी प्रतिलिटर पाणी) रोगाचा प्रादुर्भाव दिसताच, मेटॅलॅक्झिल एम अधिक मॅंकोझेब (संयुक्त बुरशीनाशक)२.५ ग्रॅम किंवा ॲझोक्झिस्ट्रॉबीन १ मि.लि. पुढील फवारणी आवश्यकतेनुसार १० दिवसांच्या अंतराने घ्यावी.

# प्रवीण टाके छत्रपती संभाजीनगरच्या माहिती उपसंचालक पदावर रूजू



**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी) –** माहिती आणि जनसंपर्क महासंचालनालयाचे उपसंचालक प्रवीण टाके यांनी सोमवारी छत्रपती संभाजीनगर विभागाचे माहिती उपसंचालक या पदाचा कार्यभार स्वीकारला.

प्रवीण टाके यापूर्वी कोल्हापूर येथे उपसंचालक म्हणून कार्यरत होते. माहिती व जनसंपर्क महासंचालनालयात २००८ ला रुजू झाल्यानंतर त्यांनी नवी दिल्ली येथील महाराष्ट्र परिचय केंद्रात जनसंपर्क अधिकारी म्हणून काम केले आहे. त्यानंतर मुंबई मंत्रालयात वरिष्ठ सहायक संचालक असताना 'लोकराज्य'चे ते कार्यकारी संपादक होते. चंद्रपूर, नागपूर व नांदेड याठिकाणी त्यांनी जिल्हा माहिती अधिकारी पदावर कार्य केले आहे. शासन सेवेत केलेल्या उल्लेखनीय कामासाठी त्यांना सन २०१९ – २० वर्षाचा यशवंतराव चव्हाण उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार जाहीर झाला आहे.

पत्रकारितेतील स्नातकोत्तर पदवी प्राप्त असलेले प्रवीण टाके यांना राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा स्व.वसंतराव ओगले पुरस्कार प्राप्त आहे. शासनात येण्यापूर्वी त्यांनी जवळपास १४ वर्ष नागपूर पत्रिका, तरुण भारत, सामना आणि लोकमत वृत्तपत्रात विविध पदावर कार्य केले आहे. त्यांची फकीर ही चरित्र कादंबरी प्रकाशित झाली आहे. वऱ्हाडी भाषेतील स्तंभकार, कवी, लेखक म्हणून त्यांची ओळख असून विविध सामाजिक विषयावर त्यांनी विपुल लेखन केले आहे. आज विभागीय माहिती कार्यालय छत्रपती संभाजीनगर येथे छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, परभणी येथील जिल्हा माहिती कार्यालयाच्या वतीने अधिकारी,कर्मचा-यांनी त्यांचे स्वागत केले.

## Change In Name

My old Name is **NASEEMA BEGUM**, Old Address - H.No. 9-5-1036, Near, Qizra Masjid, Hamidiya Colony, Qudwai Nagar, Degloor Naka, Nanded. Which now I am Changing as New Name **NASIMA BEGUM SHAIKH HAJI MIYA**. New Address - 9-5-1036, Hamidiya Colony, Malang Baba Building, Degloor Naka, Itwara, Nanded MH. 431604. Henceforth my all correspondence will be done as per my new name. Please consider the name

**- Address-**

9-5-1036, Hamidiya Colony, Malang Baba Building, Degloor Naka, Itwara, Nanded MH. 431604

---

**DISTRICT AND SESSIONS COURT NANDED**
IN THE COURT OF Balaji Umajirao Choudhari
AD-HOC DJ -1 AND ASSISTANT SESSION JUDGE NANDED, Nanded, Nanded.

NOTICE/SUMMONS IN MOTOR ACCIDENT CLAIM PETITION

M.A.C.P./288/2017
Devanand Sadashiv Ghorband Vs Baljindarsingh Guruditsingh Bhullar
10-08-2026

To,
Baljindarsingh Guruditsingh Bhullar
Mugat Tq Mudkhed Dist Nanded, MAHARASHTRA

Whereas has instituted a Motor Accident Claim Petition impleading you as one of the respondents, which case has been directed to be listed before this Tribunal/Court for hearing at 10.00 am. On **10-08-2026.**

Now therefore you are given notice to appear in this Tribunal/Court in person or by a pleader duly instructed (and able to answer all material questions relating to the suit, or who shall be accompanied by some person, able to answer all such questions), on the **10-08-2026 at 11:00 o'clock in the forenoon,** to answer the claim; and and further you are hereby directed to file on that day a written statement of your defence and to produce on the said day all documents in your possession or power upon which you base your defence, and where you rely on any other document whether in your possession or power or not, as evidence in support of your defence, you shall enter such documents in a list to be annexed to the written statement.

Take notice that, in default of your appearance on the day before mentioned, the suit will be heard and determined in your absence.

Given under my hand and the seal of the Court, this **10-07-2026**

AD-HOC DJ -1 AND ASSISTANT SESSION JUDGE NANDED

---

**जाहीर प्रगटन**

संचिका क्रं. NT/01/14376/क्षे.का.क्रं.1 तरोडा-सांगवी

प्रकरण: - नाव परिवर्तन करणे बाबत.

या जाहीर प्रगटनाच्या अधारे सर्व जनतेस कळविण्यात येते श्री/सौ मण्णाजी गंगाराम इबितदार रा. म्हाळजा. नांदेड या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, ता.नि.भु.अ. पत्र क्रं. 1051/09 दि.30/10/2009 म्हाळजा. गट नं. 27B पैकी प्लॉट क्रं. 145 पिन क्र. 40103072125 श्री/सौ पृथ्वीदास गंगाधरराव गोधमगावकर यांच्या नावे असलेली मालमता यांचेकडुन अर्ज खरेदीखत क्रं. 3308 दि.29.03.2023 च्या आधारे विकत घेतली आहे / वारसा हक्क प्राप्त झालेली आहे. तरी त्यांचे नांवे कर आ-कारणी नोंद वहीत घेण्यासाठी जाहिरप्रगटन देण्यात येत आहे.

तरी या संबंधात कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी हे पत्रक प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासून (15) दिवसाच्या आत या कार्यालयात आपला लेखी आक्षेप पुराव्यासहीत दाखल करावा. अन्यथा अवधी संपल्यानंतर अर्जदाराच्या नांवे वरील प्रमाणे मालमता नोंदविण्यात येईल.

चतु:सिमा :-
पुर्व :- प्लॉट नं. 127 ए आहे.
पश्चिम :- 9.00 मी. रुंद रोड आहे.
दक्षीण :- प्लॉट नं. 145 ए आहे.
उत्तर :- प्लॉट नं. 144 आहे.

सहाय्यक आयुक्त
क्षे.का.क्रं.01 तरोडा सांगवी,
नांदेड वाघाळा शहर महानरलिका,नांदेड

---

**जाहीर प्रगटन**
**तालुका कार्यकारी दंडाधिकारी, भोकर यांचे न्यायालयात**
**जन्म–जन्म नोंदणी सुधारणा कायदा – २०२३ मध्ये कलम ११(३) अन्वये अर्ज क्र.**

अर्जदार संभाजी सटवाजी धनवे रा. भोकर ता. भोकर जि. नांदेड

विरुध्द

जन्म - मृत्यू नोंदणी निबंधक तथा ग्रामपंचायत अधिकारी भोसी ता.भोकर

विषय:- जन्म - मृत्यू नोंदणी सुधारणा कायदा 2023 च्या कलम 11 (2) व (3) अन्वये अर्जदार संभाजी सटवाजी धनवे रा. बाबनवाडी ता. भोकर यांच्या जन्माची नोंद घेण्याकरीता आदेशीत करणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार संभाजी सटवाजी धनवे रा.बाबनवाडी ता. भोकर यांनी त्यांचा जन्म 05/01/1957 रोजी त्यांचे राहाते घरी बाबनवाडी ता. भोकर येथे झाला असून सदर जन्माची नोंद जन्म- मृत्यू नोंदणी सुधारणा कायदा 2023 च्या कलम 11 (2) व (3) अन्वये घेण्याकरीता जन्म - मृत्यू नोंदणी निबंधक तथा ग्रामपंचायत अधिकारी भोसी ता.भोकर यांचे मार्फत प्रस्ताव सादर केला आहे.

ज्याअर्थी संभाजी सटवाजी धनवे यांच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत कार्यालय भोसी येथे उपलब्ध नाही. त्याअर्थी या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस व संबंधितास कळविण्यात येते की संभाजी सटवाजी धनवे यांच्या 05/01/1957 च्या जन्माची नोंद घेण्याविषयी कोणाचा काही आक्षेप अथवा उजर असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून 15 दिवसामध्ये या कार्यालयात हजर राहून आपला आक्षेप नोंदवावा. विहीत मुदतीत हजर राहून आक्षेप किंवा उजर न केल्यास सदरच्या अर्जावर एकतर्फी आदेश पारीत करण्यात येईल.

तहसीलदार तथा
तालुका दंडाधिकारी, भोकर

---

**जाहीर प्रगटन**

संचिका क्रं. NT/01/14352/क्षे.का.क्रं.1 तरोडा-सांगवी

प्रकरण: - नाव परिवर्तन करणे बाबत.

या जाहीर प्रगटनाच्या अधारे सर्व जनतेस कळविण्यात येते श्री/सौ 1.आकाश कैलासराव बागडे 2.ममता वर्मा रा. तरोडा बु. नांदेड या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, ता.नि.भु.अ. पत्र क्रं. 1051/09 दि.30/10/2009 तरोडा बु. गट नं. 193 पैकी प्लॉट क्रं. 20 पिन क्र. 40103075642 श्री/सौ संतोष हणमंतराव कदम यांच्या नावे असलेली मालमता यांचेकडुन अर्ज खरेदीखत क्रं.1492 दि.13.02.2026 च्या आधारे विकत घेतली आहे / वारसा हक्क प्राप्त झालेली आहे. तरी त्यांचे नांवे कर आ-कारणी नोंद वहीत घेण्यासाठी जाहिरप्रगटन देण्यात येत आहे.

तरी या संबंधात कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी हे पत्रक प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासून (15) दिवसाच्या आत या कार्यालयात आपला लेखी आक्षेप पुराव्यासहीत दाखल करावा. अन्यथा अवधी संपल्यानंतर अर्जदाराच्या नांवे वरील प्रमाणे मालमता नोंदविण्यात येईल.

चतु:सिमा :-
पुर्व :- 9.00 मी. रुंद रोड आहे.
पश्चिम :- प्लॉट क्रं. 23 आहे.
दक्षीण :- प्लॉट क्रं. 21 आहे.
उत्तर :- प्लॉट क्रं. 19 आहे.

सहाय्यक आयुक्त
क्षे.का.क्रं.01 तरोडा सांगवी,
नांदेड वाघाळा शहर महानरलिका,नांदेड

---

## कागदपत्र हरवले

माझी शेख मोसीम शेख हुसैन या नावाची दहावी पासची टी.सी., मार्कमेमो व सनद नांदेड ते देगलूर प्रवासात हरवली आहे. कुणास सापडल्यास खालील पत्त्यावर आणून द्यावी योग्य ते बक्षीस दिले जाईल.

**– संपर्क पत्ता –**
**शेख मोसीम शेख हुसैन**
**अशरफनगर, हिंगोली गेट, नांदेड**

## डिग्री हरवली

माझी प्रेमा शिवाजीराव भारती या नावाची जी.एन.एम. (माऊली इन्स्टिट्युट परभणी) या कॉलेजची डिग्री सिडको ते जुना मोंढा ऑटो प्रवासात हरवली आहे. कुणास सापडल्यास खालील पत्त्यावर आणून द्यावी योग्य ते बक्षीस दिले जाईल.

**– संपर्क पत्ता –**
**प्रेमा शिवाजीराव भारती**
**रा. संभाजीचौक, सिडको, नांदेड**
**मो.नं. ८८०६६२०७४६**

## टी.सी. हरवली

माझी शेख आफरीन बेगम शेख बशीर अहेमद या नावाची दहावी पासची टी.सी. नांदेड ते वसमत प्रवासात हरवली आहे. कुणास सापडल्यास खालील पत्त्यावर आणून द्यावी योग्य ते बक्षीस दिले जाईल.

**– संपर्क पत्ता –**
**आफरीन बेगम शेख बशीर अहेमद**
**टप्पा मस्जिद, शुक्रवारपेठ,**
**वसमत जि. हिंगोली**
**मो.नं. ९८३४१८४६१८**

---

**-: : जाहीर प्रगटन : :-**

नियोजीत महासमृध्दी अर्बन सहकारी पतसंस्था मर्या., नांदेड ता. जि. नांदेड.

नियोजीत संस्थेचे मुख्यप्रवर्तक श्री. गिरीष प्रभाकराव जाधव, रा. शांकुतल निवास-०७, भाग्य नगर रोड, शास्त्री नगर, नांदेड ता. जि. नांदेड यांनी महासमृध्दी अर्बन सहकारी पतसंस्था मर्या., नांदेड ता. जि. नांदेड या संस्थेचा नोंदणी प्रस्ताव या कार्यालयात सादर केलेला आहे. मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालयाकडील परिपत्रक दि. ०८ मार्च, २०१९ अन्वये नियोजित संस्थेची नोंदणी करणे पुर्वी संस्थेच्या कार्यक्षेत्रातील अस्तित्वात असलेल्या संस्थांची सुनावणी घेऊन गुणवत्तेनुसार निर्णय घ्यावा अशा सुचना आहेत. नियोजीत महासमृध्दी अर्बन सहकारी पतसंस्था मर्या., नांदेड ता. जि. नांदेड या संस्थेचे कार्यक्षेत्र नांदेड जिल्हा प्रस्तावित केलेले आहे.

तरी जिल्ह्यातील सर्व नागरी / ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थांना या जाहीर प्रगटणाद्वारे कळविण्यात येते की, सदर प्रकरणी दि. ११ ऑगष्ट्र, २०२६ रोजी दुपारी १.०० वाजता सुनावणी या कार्यालयात ठेवण्यात आली आहे. सदर सुनावणीस आपण उपस्थित राहुन नियोजित संस्थेच्या नोंदणीबाबत आपले काही म्हणणे/आक्षेप असल्यास लेखी सादर करावे. अन्यथा आपले काही म्हणणे नाही असे गृहितधरुन पुढील कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

(शातुराज हिरे)
जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, नांदेड

---

जा.क्रं.नांवाशमनपा/जयमा/ 8025 /२०२६
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड
दिनांक - 29 JUL 2026

**ई - लिलाव सुचना (चौथ्यांदा)**

सर्व वाहनतळ ठेकेदारांना या जाहिर ई-लिलाव (E-AUCTION) सुचनेद्वारे कळविण्यात येते की, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीतील तयबाजारी, आठवडी बाजार, दैनिक जमीन भाडे (नो हॉकर्स झोन वगळून) भाडे वसुलीचा मक्ता ताबा तारखेपासून एक वर्षाच्या कालावधी पर्यंत नियम व अटीनुसार द्यावयाचा आहे.

ईच्छुक लिलावधारकांना/ठेकेदारांना लिलावात विहित मुदतीत भाग घेण्यासाठी (https://eauction.gov.in) या संकेतस्थळावर digital signature चे रजिस्ट्रेशन करणे अनिवार्य आहे.

लिलावधारक/ठेकेदार यांनी लिलावाची कोरी निविदा किंमत (Tender Fee) रुपये १५०००/- नापरतावा व अनामत रक्कम रुपये ५,००,०००/- रक्कमेचा राष्ट्रीयकृत बँकेचा धनाकर्ष (डी.डी.) च्या स्वरुपात, आधारकार्ड, पॅनकार्ड सिलबंद लिफाफ्यात आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांचे नावे दि.04/08/2026..रोजी15:00वाजे पासून ते दि.21/08/2026..रोजी15:00 वाजे पर्यंत (शासकीय सुट्टीचे दिवस सोडून कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत) मालमत्ता विनियोग व व्यवस्थापन विभाग, मुख्य प्रशासकीय इमारत, दुसरा मजला, कक्ष क्रं. २१५ नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड या कार्यालयाकडे जमा करावेत.

सदरील मक्त्याच्या नियम व अटी (https://eauction.gov.in) या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून ई-लिलाव (E-AUCTION) ऑनलाईन वर खरेदी व जमा करण्यात यावे. निविदा फक्त इंटरनेटवर खरेदी करता येतील व ऑनलाईन भरता येतील.

**ई-लिलाव प्रक्रियेचे वेळापत्रक**

| अ.क्रं | तपशिल | लिलाव प्रसिद्धीचा दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| १ | प्रसिद्ध दिनांक | 04/08/2026 | १५:०० |
| २ | कागदपत्र/इसारा रक्कम सुरु करण्याचा दिनांक व वेळ | 04/08/2026 | १६:०० |
| ३ | कागदपत्र/इसारा रक्कम सादर करण्याचा अंतिम दिनांक व वेळ | 21/08/2026 | १५:०० |
| ४ | कागदपत्र/इसारा रक्कम मंजुरीचा दिनांक व वेळ | 21/08/2026 | १५:०० |
| ५ | कागदपत्र/इसारा रक्कम मंजुरीचा अंतिम दिनांक व वेळ | 25/08/2026 | १८:०० |
| ६ | ई-लिलाव सुरु करण्याचा दिनांक व वेळ | 27/08/2026 | ११:०० |
| ७ | ई-लिलाव अंतिम दिनांक व वेळ | 27/08/2026 | १५:०० |

कोणतेही कारण न देता लिलाव अंशत:/पुर्णता मंजुर किंवा नामंजुर करण्याचा अंतिम अधिकार मा.आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांना राखुन ठेवला आहे.

ई-लिलाव बाबत काही शंका अथवा तांत्रिक अडचणी असल्यास कृपया २४x७ हेल्पलाईन नं.१८००-३०७०-२२३२ या टोल फ्रि नंबरवर संपर्क साधावा.

उपआयुक्त
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

---

## Change In Name

My old Name is **KARIM KHAN** Which now I am Changing as New Name **KARIM KHAN AFZAL KHAN**. Henceforth my all correspondence will be done as per my new name. Please consider the name.

**- Address-**
**S/o. Afzal Khan, Bilal Nagar, Degloor Naka, Itwara Nanded, Maharashtra, 431604**
**M.No.-8956313888**

## Change In Name

My old Name is **NASEEMA BEGUM** Which now I am Changing as New Name **NASEEMA BEGUM ABDUL RAHEEM**. Henceforth my all correspondence will be done as per my new name. Please consider the name

**- Address-**
**9-6-827, khusru nagar, degloor naka, Itwara Nanded S.O, Nanded, Maharashtra - 431604**
**Mo. No. 9822211436**

## Change In Name

My old Name is **SHAIKH KHAYUM S/O SHAIKH AHEMAD** Which now I am Changing as New Name **KHAYUM SHAH AHEMAD SHAH**. Henceforth my all correspondence will be done as per my new name. Please consider the name.

**- Address-**
**H.No.9-6-952, Millat nagar,Opp Hamza masjit, Degloor Naka, Nanded, Pin-431604**
**Mob : 9421766363**

## Change In Name

My old Name is **AFSARI BEGUM KHAYUM SHAH** Which now I am Changing as New Name **AFSARI BEGUM SHAIKH KHAYUM**. Henceforth my all correspondence will be done as per my new name. Please consider the name

**- Address-**
**H No.9-6-952 Millat nagar,Opp Hamza Masjid, Degloor Naka, Nanded, Pin-431604**
**Mob : 9421766363**

## Change In Name

My old Name is **SHAIKH SANA NAHEED** Which now I am Changing as New Name **SHAIKH SANA NAHEED SHAIKH SALEEMUDDIN**. Henceforth my all correspondence will be done as per my new name. Please consider the name

**- Address-**
**H.No. 801, Nomaniya Nagar, Near Sana High School, Taroda Bk. Nanded 431605**
**Mo.No. 9421850987**

## Change In Name

My old Name is **SHAHLA ANJUM PATHAN JAMAL KHAN** Which now I am Changing as New Name **SHAHLA ANJUM**. Henceforth my all correspondence will be done as per my new name. Please consider the name

**- Address-**
**Plot No. 5, Barkatpura, Waghi Road, Nanded, Nanded 431601 Maharashtra India**
**Mo.No. 8788443776**

## Change In Name

My old Name is **SHAIKH AZIM SHAIKH CHOTEMIYA** Which now I am Changing as New Name **SHAIKH AZEEM SHAIKH CHOTEMIYA**. Henceforth my all correspondence will be done as per my new name. Please consider the name

**- Address-**
**H.No. 1-20-25, Higoli Gate, Ashraf Nagar, Nanded Post. Shivaji Nagar, Nanded**

## Change In Name


My old Name is **SHAIKH SHAKEELA BI** Which now I am Changing as New Name **SHAKELLABI SHAIKH AZEEM**. Henceforth my all correspondence will be done as per my new name. Please consider the name

**- Address-**
**H.No. 1-20-25, Higoli Gate, Ashraf Nagar, Nanded Post. Shivaji Nagar, Nanded**


**कुत्रीचे पिल्ले विकणे आहे**

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.

संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८




## Change In Name

My old Name is **A AMER KHAN ABDUL AZIZ KHAN** Which now I am Changing as New Name **AMER KHAN ABDUL AZIZ KHAN**. Henceforth my all correspondence will be done as per my new name. Please consider the name

**- Address-**
**BEHIND JAMA MASJID, MANIYAR GALLI, BHOKAR, NANDED. 431801**
**Mob: 8412084808**

## Change In Name

My old name is **ABDUL FAOZIA BEGUM ABDUL MAJEED** which now I am changing as new name: **ABDUL FAOZIYA BEGUM ABDUL MAJEED** Hence forth my all correspondence will be done as per my new name please consider the same.

**Address :- AT POST TAGLINE GALLI TQ MUKHED-431715 DIST. NANDED**
**Contact Details: 9860313284**

## Change In Name

My old Name is **ADILAZAM SYAD** Which now I am Changing as New Name **SYED ADIL SYAD AZAM**. Henceforth my all correspondence will be done as per my new name. Please consider the name

**- Address-**
**A-14, Triveni Nagar, Taroda Bk. 431605**
**Mo.No. 987870886**

रामबाण ईलाज
वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.
:: पत्ता ::
सेवा क्लिनीक
गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९
संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९७०१, ९८६०७२१३५६

गोदातीर समाचार

पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस
हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...

किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.
पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308



# झुलेलाल भवनमध्ये ‘तिर्रट’चा जुगार

## पाच आरोपींसह ३.५० लाखांचा मुद्देमाल जप्त



**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्ह्यात अवैध धंद्यांविरुद्ध पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या आदेशानुसार सुरू असलेल्या विशेष मोहिमेअंतर्गत वजिराबाद पोलीस ठाण्याच्या हद्दीतील अबचलनगरच्या झुलेलाल भवनमध्ये सुरू असलेल्या अवैध तिर्रट जुगार अड्ड्यावर वजिराबाद गुन्हे शोध पथकाने धाड टाकून मोठी कारवाई केली.

या कारवाईत पाच आरोपींना ताब्यात घेऊन एकूण ३ लाख ५५ हजार ३०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. दि. २ ऑगस्ट रोजी सायंकाळी वजिराबाद गुन्हे शोध पथकातील पोउपनि. सुनील बुलंगे व त्यांचे पथक गस्त घालत असताना त्यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, झुलेलाल मंदिर भवन, रूम क्रमांक ३०९, अबचलनगर, नांदेड येथे काही जण पैशांवर तिरट नावाचा जुगार खेळत आहेत.

या माहितीची खातरजमा करून पंचांसह पोलीस पथकाने तात्काळ घटनास्थळी छापा टाकला. तेथे पाच इसम गोलाकार बसून पैशांवर तिरट जुगार खेळताना आढळून आले. जुगार अड्ड्यावरून पोलिसांनी रवी पेगाजी गवळे (वय ४१ वर्षे, रा. गुरुवार बाजार, सिडको, नांदेड, विकास रामराव सरपाते (वय ३५ वर्षे, रा. गुरुवार बाजार, सिडको, नांदेड.), मुकेश पांडुरंग लोलगे (वय ३६ वर्षे, रा. भोजाल गवळी चौक, नांदेड.), चंद्रशेखर गणपतराव पवार (वय ३३ वर्षे, रा. सिडको, नांदेड) आणि अतुल भगवानराव वाडे (वय ३७ वर्षे, रा. गुरुवार बाजार, सिडको, नांदेड) यांना अटक केली.

पोलिसांनी स्वतःची व पंचांची अंगझडती देऊन कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर आरोपींची झडती घेतली. यावेळी पोलिसांनी रोख रक्कम २५ हजार ३०० रुपये, ५ मोबाईल फोन १ लाख १० हजार, ४ दुचाकी वाहने २ लाख २० हजार रुपये, जुगाराचे बदक छाप पत्ते एकूण ३ लाख ५५ हजार ३०० रुपये अशा सर्व मुद्देमालाचा पंचनामा करून जप्त करण्यात आला आहे. आरोपींविरुद्ध वजिराबाद पोलीस ठाण्यात गु.र.नं. ३९१/२०२६ कलम ४ व ५ महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियमप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. तपास वजिराबाद पोलीस करत आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक डॉ निलाभ रोहन आणि पोलीस निरीक्षक अजित कुंभार यांच्या आदेशाने सहायक पोलीस निरीक्षक श्री लोंढे, पोउपनि सुनील बुलंगे व गुन्हे शोध पथकातील पोलीस अंमलदार गणेश धुमाळ, विलास कदम, ज्वालासिंघ बावरी, इम्रान पठाण, संतोष पोकळे, किशोर जयस्वाल सर्व नेमणूक पोलीस स्टेशन वजिराबाद यांनी पार पाडली आहे.

# पदभाराच्या पहिल्याच महिन्यात डॉ. निलाभ रोहन ‘ॲक्शन मोड’वर



**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्हा पोलीस अधीक्षकपदाचा पदभार स्वीकारल्यापासून अवघ्या एका महिन्यातच डॉ. निलाभ रोहन यांनी जिल्ह्यात आपल्या धडक कारवायांचा सपाटा लावला आहे.

पदभार स्वीकारताच जिल्ह्यात अवैध धंदे अजिबात चालणार नाहीत,असा थेट इशारा देणाऱ्या नव्या एसपींच्या नेतृत्वात नांदेड पोलिसांनी महिनाभरात तब्बल १६ कोटी २५ लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करीत अनेक गंभीर गुन्ह्यांचा छडा लावला आहे.

तत्कालीन पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या बदलीनंतर २४ जून २०२६ रोजी डॉ. निलाभ रोहन यांनी नांदेडचा पदभार स्वीकारला होता. त्यांनी पदभार घेताच गुन्हेगारी नियंत्रण, महिला सुरक्षा आणि अवैध धंद्यांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी सर्व ठाणे प्रमुखांना स्पष्ट सूचना दिल्या होत्या. त्यानंतर संपूर्ण जिल्ह्यात पोलिसांनी कारवायांचा धडाका सुरू केला आहे.

### १ महिन्यातील कारवाईचा तपशील

वाळू चोरी–१४, १९, ३७, ६६४ रुपये, गुटखा– ६०, ८९, २४६ रुपये, जुगार– ४९, १०, ३५० रुपये, दारूबंदी– २६, ३१,७९० रुपये, अंमली पदार्थ– २५, ७१, ९५० रुपये, शस्त्र अधिनियम (३/२५) ६ पिस्टल, २ मॅगझीन, शस्त्र अधिनियम (४/२५)१७तलवार/ खंजर/कुकरी, पाकिस्ताननिर्मित कॉस्मेटिक – ३९,६९,९४०रुपयांचा मुद्देमाल जप्त.

### सुरक्षा आणि जनजागृतीवर भर

केवळ दंडात्मक कारवायांवर न थांबता डॉ. निलाभ रोहन यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात सायबर गुन्हेगारी, महिला सुरक्षा आणि वाहतूक नियमांच्या जनजागृतीसाठी विशेष उपक्रम राबवले जात आहेत.

### ‘ट्रायल मॉनिटरिंग सेल’ची अनोखी संकल्पना

न्यायालयीन खटल्यांमध्ये प्रभावी तपास आणि भक्कम पुरावे सादर करण्यासाठी ‘ट्रायल मॉनिटरिंग सेल’ची स्थापना करण्यात आली आहे. या सेलच्या प्रभावी कामगिरीमुळे माळाकोळी, हिमायतनगर, नांदेड ग्रामीण हद्दीतील अत्याचाराची गंभीर प्रकरणे आणि किनवट येथील पत्नीवर जीवघेणा हल्ला या खटल्यांमध्ये आरोपींना न्यायालयाने तत्परतेने कठोर शिक्षा सुनावली आहे. यामुळे जिल्ह्यात कायद्याचा आणि पोलिसांचा मोठा धाक निर्माण झाला आहे.

### ‘या’ मोठ्या कारवाया ठरल्या हायलाइट!

अनैतिक मानवी वाहतुकीवर प्रहार– मानवी तस्करीप्रकरणी २ गंभीर गुन्हे दाखल करत १३ जणांवर कठोर कारवाई करण्यात आली. ‘मेड इन पाकिस्तान’ रॅकेटचा पर्दाफाश– शहरातील इतवारा भागातून बंदी असलेली ’मेड इन पाकिस्तान’ सौंदर्यप्रसाधने जप्त केली. याप्रकरणी मुख्य म्होरक्याला मुंबईच्या कारागृहातून ताब्यात घेतले असून, राज्यभरात पसरलेले हे रॅकेट उद्ध्वस्त केले. अल्पवयीन मुलींची सुटका– अपहरण झालेल्या १९ मुली आणि १ मुलाचा सुरक्षित शोध घेण्यात पोलिसांना यश आले. तसेच बेपत्ता असलेल्या २९ महिला व २२ पुरुषांना शोधून कुटुंबीयांच्या स्वाधीन केले.

इतर कारवाया– आंतरजिल्हा घरफोडी टोळी, पंजाब राज्यातील अमली पदार्थाची तस्करी, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे अपहरण आणि सायबर फसवणुकीतील ’म्यूल अकाऊंट’च्या आंतरराज्यीय रॅकेटचा पर्दाफाश केला. गहाळ मोबाईल परत– नागरिकांचे गहाळ झालेले तब्बल ४७१ मोबाईल शोधून काढून ते मूळ मालकांना परत मिळवून दिले. पहिल्याच महिन्यात एसपींच्या या ‘ॲक्शन मोड’ मुळे गुन्हेगार बॅकफूटवर आले असून, सामान्य नांदेडकरांमधून समाधान व्यक्त केले जात आहे.



**नांदेड–** येथे आज सालाना बरसी उत्सवाच्या पार्श्वभूमीवर रतनगड गुरुद्वाराचे संतांच्या उपस्थितीत उदघाटन झाले. येथील गुरुद्वारा लंगर साहिब चा सालाना बरसी उत्सव ४ ऑगस्ट २०२६ रोजी होत आहे. देश–विदेशातून हजारो भाविक या पवित्र उत्सवासाठी नांदेडमध्ये दाखल झाले आहेत.

# ‘एसआयआर’ अंतर्गत नांदेड दक्षिणचे ९९ टक्के काम पूर्ण

**नांदेड (प्रतिनिधी) –** ८७–नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघातील ‘विशेष सखोल पुनर्निरक्षण’ मोहिमेअंतर्गत प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करण्याचे काम अंतिम टप्प्यात पोहोचले असून आजअखेर ९९ टक्के काम पूर्ण झाले आहे. उर्वरित केवळ १,८४७ मतदारांचे काम शिल्लक असून येत्या तीन दिवसांत १०० टक्के काम पूर्ण होण्याची शक्यता असल्याची माहिती मतदार नोंदणी अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ यांनी दिली.

# शंकर गायकवाड यांचे निधन

**नांदेड (प्रतिनिधी) –** तरोडा बु. मधील बालाजीनगर भागात राहणारे पाटबंधारे विभागातून सेवानिवृत्त झालेले कर्मचारी शंकर मारोती गायकवाड (वय ६९) यांचे शनिवार दिनांक १ आगस्ट २०२६ रोजी मध्यरात्री दीडच्या सुमारास दीर्घ आजाराने निधन झाले.



त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, दोन मुली, नातू, पंतु असा मोठा परिवार आहे.

# कर्जमाफी, शक्तीपीठ महामार्ग आणि बोगस बियाण्यावरून तुपकरांचा आंदोलनाचा इशारा



**नांदेड (प्रतिनिधी)–** राज्य सरकारच्या ‘आहिल्याबाई होळकर कर्जमाफी’ योजनेवर शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी जोरदार टीका केली आहे. ही योजना शेतकऱ्यांची घोर फसवणूक असल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

नांदेड येथे सोमवार दिनांक ३ ऑगस्ट रोजी सकाळी आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना तुपकर म्हणाले, कर्जमाफीमुळे शेतकऱ्यांचे ‘सीबील’ रेकॉर्ड खराब होत असून, भविष्यात शिक्षण, शेती किंवा इतर कारणांसाठी कर्ज मिळण्यात अडचणी निर्माण होत आहेत. सरकारकडे शेतकऱ्यांसाठी निधी नसल्याचे सांगितले जाते, मात्र मोठ्या प्रकल्पांसाठी आणि उद्योगपतींसाठी निधी उपलब्ध होतो. आमदार, मंत्री आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या खर्चात कपात करून शेतकऱ्यांना मदत करावी, अशी मागणी त्यांनी केली. यावेळी त्यांनी शक्तीपीठ महामार्ग प्रकल्पालाही विरोध दर्शवत हा प्रकल्प तातडीने थांबवावा, अशी मागणी केली. शेतकऱ्यांनी हा महामार्ग मागितलेला नसून, त्यांच्या जमिनी संपादित करून त्यांचे नुकसान केले जात असल्याचा दावा त्यांनी केला. समृद्धी महामार्गामुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नात किंवा निर्यातीत अपेक्षित वाढ झालेली नसल्याचेही ते म्हणाले.

नांदेडसह सीमावर्ती भागात बोगस बियाण्यांचे मोठे रॅकेट कार्यरत असल्याचा गंभीर आरोपही तुपकर यांनी केला. आंध्र प्रदेश, तेलंगणा आणि कर्नाटकातून बोगस बियाणे येत असून, शेकडो बोगस कंपन्या काही अधिकाऱ्यांच्या संरक्षणाखाली कार्यरत असल्याचा दावा त्यांनी केला. आंदोलन करणाऱ्या शेतकरी कार्यकर्त्यांवर तडीपारीसह विविध कारवाया करून सरकार दडपशाही करत असल्याचा आरोप करत, ही दडपशाही तातडीने थांबवावी, अन्यथा रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही रविकांत तुपकर यांनी दिला.

# CCMP पात्र BHMS डॉक्टरांना MMC नोंदणीच्या विरोधात IMA महाराष्ट्रचा २४ तासांचा संप

## रुग्णसेवा ४ ऑगस्ट सकाळी ६ ते ५ ऑगस्ट सकाळी ६ पर्यंत बंद राहणार

**नांदेड (प्रतिनिधी)–** इंडियन मेडिकल असोसिएशन, महाराष्ट्र राज्य तर्फे MRD, SMI आणि विविध तज्ञ वैद्यकीय संघटनांच्या पाठिंब्याने, CCMP अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या BHMS डॉक्टरांना महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलची नोंदणी देण्याच्या प्रस्तावित निर्णयाच्या विरोधात २४ तासांची वैद्यकीय सेवा बंद आंदोलन जाहीर करण्यात आले आहे. आएमए संघटनेचे जिल्हा अध्यक्ष प्रल्हाद कोटकर आणि सचिव राहुल लव्हेकर यांनी कळविले आहे

BHMS-CCMP प्रॅक्टिशनर्सना महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलमध्ये नोंदणी देण्याचा विचार सुरू आहे. हा निर्णय ॲलोपॅथी वैद्यकीय बंधूंना आधुनिक वैद्यकशास्त्राचे दर्जा, सचोटी आणि वैज्ञानिक पाया धोक्यात आणणारा वाटत आहे. त्याचे सार्वजनिक आरोग्य आणि रुग्णांच्या सुरक्षेवर दीर्घकालीन गंभीर परिणाम होऊ शकतात, अशी भीती वैद्यकीय क्षेत्रात आहे.

संबंधित शासकीय विभाग आणि मंत्रालयाला याआधी अनेकदा पत्रे, निवेदने आणि पत्रकार परिषदांद्वारे आमच्या चिंता कळवण्यात आल्या होत्या. मात्र वैद्यकीय बंधूंनी उपस्थित केलेल्या मुद्द्यांकडे पुरेसे लक्ष दिले गेले नाही. या परिस्थितीत इतर कोणताही प्रभावी पर्याय नसल्याने, सार्वजनिक आरोग्याच्या मोठ्या हितासाठी आणि पुरावा–आधारित आधुनिक वैद्यकीय पद्धतीचे मानक जपण्यासाठी इंडियन मेडिकल असोसिएशन, महाराष्ट्र राज्याने हे आंदोलन करण्याचा निर्णय घेतला आहे.

हे आंदोलन ४ ऑगस्ट सकाळी ६ वाजता सुरू होऊन ५ ऑगस्ट सकाळी ६ वाजेपर्यंत चालेल. आणि जर नोंदणी प्रक्रिया सुरूच झाली, तर सेवा बंद आंदोलन अनिश्चित काळासाठी सुरू राहील.

सर्व सदस्यांना या सामूहिक कृतीला पूर्ण पाठिंबा देण्याचे आणि एकजूट राखण्याचे आवाहन करण्यात आले आहे. हे आंदोलन रुग्णांच्या विरोधात नसून, रुग्णांची सुरक्षा, सार्वजनिक आरोग्य आणि वैद्यकीय व्यवसायाच्या रक्षणासाठी केले जात आहे.




**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड–४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड–४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड–(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com